मंगळवार, ८ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक -१३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 8 AUGUST 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-03 ● ISSUE-13 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# मणिपूर हिंसाचार : सीबीआय तपासावर सुप्रीम कोर्टाचा वॉच

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मणिपूर हिंसाचार प्रकरणी सोमवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. कोर्टाने मदत आणि पुनर्वसन कामाच्या देखरेखीसाठी तीन माजी न्यायाधीशांची समिती नियुक्ती केली आहे. त्याशिवाय, सीबीआयकडून सुरू असलेल्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी एका माजी अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.



सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर मणिपूर हिंसाचार प्रकरणी सुनावणी झाली. सीबीआयकडून महिलांवर झालेल्या अत्याचाराप्रकरणी तपास सुरू आहे. सीबीआयच्या तपासावर मुंबईचे माजी पोलीस आयुक्त दत्ता पडसाळगीकर हे देखरेख ठेवणार आहेत. तर, हिंसाचारग्रस्तांच्या मदत आणि पुनर्वसनाच्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी तीन माजी न्यायाधीशांची समिती नेमण्याता आली आहे. या समितीमध्ये, गीता मित्तल, शालिनी जोशी आणि आशा मेनन यांचा समावेश असणार आहे. हायकोर्टाच्या माजी न्यायमूर्ती गीता मित्तल या समितीच्या अध्यक्ष असणार आहे. या सुनावणीच्या दरम्यान, ॲटर्नी जनरल वेंकटरमनी यांनी सांगितले की, 6500 एफआयआरचे वर्गीकरण करण्यात आले असून कोर्टाला सादर करण्यात आले आहे. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यांनी सांगितले की, हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीचे नेतृत्व पोलीस अधीक्षक रँकचे अधिकारी करतील. महिलांवर झालेल्या अत्याचाराप्रकरणाच्या तपासासाठी वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात एसआयटी स्थापन होणार आहे. अशा प्रकारे इतर प्रकरणातही एसआयटी स्थापन करण्यात आले आहे.

दर 15 दिवसानंतर पोलीस महासंचालक अहवाल मागवतील. हिंसाचाराने ग्रस्त असलेल्या सहा एसआयटी स्थापन करण्यात आल्या आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, सीबीआयकडे आधीच 11 प्रकरणे तपासासाठी सोपवण्यात आले आहेत. त्यांचा तपास सीबीआयच करणार आहे. महिलांशी संबंधित प्रकरणातील तपास सीबीआयच्या महिला अधिकारी असतील. सुनावणी दरम्यान ज्येष्ठ वकील ॲड. इंदिरा जयसिंह यांनी सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीत एक एसआयटी स्थापन करण्याची मागणी केली. महिला सामाजिक कार्यकर्त्यांचीही एक समिती नेमावी आणि त्यांनी पीडित महिलांशी संवाद साधावा. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले की, लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही उच्च न्यायालयाच्या 3 माजी न्यायाधीशांची एक समिती स्थापन करण्याचा विचार करत आहोत जी मदत आणि पुनर्वसनाचे काम पाहतील. माजी न्यायाधीशांच्या समितीचे अध्यक्ष या जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश गीता मित्तल असतील, तर अन्य दोन सदस्य न्यायमूर्ती शालिनी जोशी आणि आशा मेनन असतील. सरन्यायाधीश चंद्रचूड पुढे म्हणाले की 11 FIR सीबीआयकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत, आम्ही त्यात हस्तक्षेप करणार नाही. परंतु सीबीआय टीममधील किमान 5 अधिकारी डेप्युटी एसपी किंवा एसपी दर्जाचे असावेत. हे अधिकारी इतर राज्यातील पोलिस असले पाहिजेत, परंतु स्थानिक लोकांशी हिंदीत बोलू शकतात. सीबीआयचा तपास मुंबईचे माजी पोलीस आयुक्त दत्ता पडसाळगीकर करतील.

राज्य सरकारने 42 एसआयटी स्थापन करण्याबाबत भाष्य केले . प्रत्येक एसआयटीमध्ये किमान एक पोलीस निरीक्षक असावा, हा पोलीस निरीक्षक इतर राज्यातील असावा . इतर राज्यातून पोलीस महासंचालक दर्जाचे 6 अधिकारी असावेत, जे 42 एसआयटीच्या कामावर देखरेख करतील .



# संभाजी भिडेंच्या समर्थनार्थ दुग्धाभिषेक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** विविध हिंदुत्ववादी संघटनांनी सोमवारी एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संभाजी भिडे यांच्या समर्थनार्थ निदर्शने केली. यावेळी भिडे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करण्यात आला. हिंदुत्ववादी संघटनांतर्फे पोलीस प्रशासनाला निवेदनही देण्यात आले. जिल्ह्यातील विविध हिंदुत्ववादी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भिडे गुरुजींच्या समर्थनार्थ निदर्शने केली. यावेळी विविध घोषणांनी आणि विविध देशभक्तिपर गीतांनी परिसर दुमदुमून गेला होता. समर्थनाचे फलक कार्यकर्त्यांनी हातात धरले होते.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक भिडे गेले काही दिवस संपूर्ण महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा या उपक्रमासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी बैठका घेत आहेत. त्यातील काही वक्तव्यांचा ठराविक भाग वगळून समाजकंटक जाणीवपूर्वक विपर्यास करून समाजमाध्यमांचा गैरवापर करून समाजामध्ये तेढ व तणाव निर्माण करीत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. राजकीय संघटना आणि काही उथळ व स्वार्थी नेतेमंडळी विरोधात कटकारस्थान करीत असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर प्रशासनाने संबंधितावर कठोर कारवाई करून योग्य ते गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी हिंदुराष्ट्र सेना, हिंदू जनजागृती समिती, सनातन संस्था, विश्व हिंदू परिषद, शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान, बजरंग दल, वीर जवान ग्रुप, एक दिवस महाराजांसाठी प्रतिष्ठान ( यावल ), जुने जळगाव मित्रमंडळ, साईनाथ तरुण मित्रमंडळ, सराफ बाजार मित्रमंडळ, तरुण कुढाबा मंडळ, श्रीकृष्ण मित्रमंडळ, बाजीप्रभू मित्रमंडळ, शिवाजीनगर मित्रमंडळ, शाहूनगर मित्रमंडळ, लोकमान्य मित्रमंडळ, वज्रेश्वरी देवी गणेश मंडळ, जय गणेश मंडळ, न्यू अचानक मित्रमंडळ, मोरया मित्रमंडळ, भास्कर मार्केट मित्रमंडळ, गुरुदत्त मित्रमंडळ यांसह जिल्हाभरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जातनिहाय जनगणना गरजेची

## नाना पटोले : भाजपा व मोदी बहुजन समाजविरोधी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात बहुजन समाजाचेही मोठे योगदान आहे पण आजची परिस्थिती वेगळी आहे, जे लोक स्वातंत्र्य लढ्यात सहभागी नव्हते त्यांच्या हातात सत्ता गेली असून हेच लोक संविधान संपवण्याचे काम करत आहेत. भाजपा व मोदी सरकार हे बहुजन समाजाला फक्त मतांसाठी वापरून घेतात, अधिकार मात्र काहीच देत नाहीत. बहुजन समाजाला न्याय मिळवायचा असेल तर जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, अशी आग्रही भुमिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मांडली.

जालन्यात जिल्हा काँग्रेस कमिटीने आयोजित केलेल्या सामाजिक न्याय मेळाव्यात नाना पटोले बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री नारायण मुंडे, विधान परिषदेचे आमदार राजेश राठोड, माजी आमदार कल्याण काळे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड, प्रदेश सरचिटणीस सत्संग मुंडे, जितेंद्र देहाडे जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख आदी उपस्थित होते.

मेळाव्याला मार्गदर्शन करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, केंद्रात डॉ. मनमोहनसिंह यांचे सरकार असताना ओसीबी समाजाचा सविस्तर डेटा बनवला होता पण नंतर आलेल्या नरेंद्र मोदी सरकारने तो जाहीर केला नाही. विधानसभेचा अध्यक्ष असताना मी स्वतः जातनिहास जनगणनेचा प्रस्ताव सादर करून तो मंजूर करुन घेतला, त्यानंतर देशातील इतर राज्यातून तसे प्रस्ताव मंजूर करणात आले. सर्व जातींना न्याय देण्याचा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनियाजी गांधी, राहुलजी गांधी यांचा प्रयत्न आहे. केंद्रात काँग्रेस सत्तेत आल्यानंतर जातनिहाय जनगणना केली जाईल असे आश्वासन कर्नाटक विधानसभेच्या निवडणुक प्रचारात राहुलजी गांधी यांनी दिले आहे. बहुजन समाजाने आता जागे झाले पाहिजे आणि समाजाच्या हिताचे रक्षण करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भुमिका घेतली पाहिजे, असे आवाहनही नाना पटोले यांनी केले.



**‘इंडिया’ का चालत नाही? :** मेळाव्यानंतर पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या हुकुमशाही, मनमानी सरकारविरोधात देशभरातील प्रमुख पक्षांनी आघाडी स्थापन केली असून या आघाडीचे नाव ‘इंडिया’ असे ठेवण्यात आले आहे . या नावावरही भाजपा आक्षेप घेत आहे . भाजपाला मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया चालते तर मग ‘इंडिया’ का चालत नाही, असा टोला पटोले यांनी लगावला .

# डोळ्यांच्या ड्रॉपचा तुटवडा; निंबोळी ट्यूबची मागणी वाढली

## ट्यूबचीही कमतरता : मेडिकलवर ड्रॉप मिळेना, सरकारी दवाखान्यात ड्रॉपच नाहीत




आधुनिक केसरी न्यूज


एकनाथ आवचार चारठाणकर

**चारठाणा :** मागील काही दिवसापासून सर्वत्र डोळे येण्याची साथ सुरु आहे. घरातील प्रत्येकाला डोळ्याच्या आजाराने घेरले आहे. एकाच वेळी डोळ्याचे आजार उद्भवल्याने डोळ्याला लागणाऱ्या आय ड्रॉपचा तुटवडा पडला आहे. सध्या कित्येकांना आधार ठरला तो स्वस्तात मिळणाऱ्या निंबोळी ट्यूबचा. या ट्यूबने एका रुपयात रुग्ण बरा होत आहे. मात्र सध्या निंबोळी ट्यूबचादेखील तुटवडा पडलेला दिसून येत आहे.

संपूर्ण राज्याला एकाच वेळी डोळे येण्याचा विषाणू जण्य रोगाने ग्रासले. प्रत्येक घरात रुग्ण आहेत. सर्वच वयोगटातील लोकांना डोळे येण्याची साथ पसरली आहे. मेडिकल स्टोअरवरती असलेले अँटी बायोटिक व स्टॉराईड हे घटक असलेल्या आय ड्रॉपचा तुटवडा निर्माण झाला आहे. प्रत्येक घरात रुग्ण असल्याने त्याची मागणी वाढली तर ज्यांना तुटवडा निर्माण होण्याची भीती निर्माण झाली अशा लोकांनी आय ड्रॉप खरेदी करून घेतले. त्यामुळे आय ड्रॉपचा तुटवडा निर्माण झाला. यावर एक उपाय म्हणून सर्वात जुना फार्मुला जो प्रत्येक घरी माहित होता आणि डोळे येण्यापासून बाळ जन्माला आल्यावर त्याच्या नाळाला लावण्यासाठी व जखमेवर लावण्यासाठी निंबोळी ट्यूबचा वापर होत होता. मात्र मध्यंतरी त्याचा उपयोग कमी झाला आणि त्याचा विसर पडला. औषध विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार पूर्वी आठवड्याला एक बॉटल निंबोळी ट्यूब लागायच्या आणि त्या फार स्वस्त होत्या. सध्या एका रुपयाला दोन असून डोळे येण्याच्या आजारात त्याची खूप मागणी वाढली. एका रुपयात दोन येणारे निंबोळी ट्यूब दिवसाला दोन ते तीन बॉटल लागत आहेत. मात्र त्याचा तुटवडा निर्माण झालेला आहे. ज्यांना संसर्ग झाला आहे त्यांना प्रकाशाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे त्यांनी गॉगल वापरावे, तसेच हात स्वच्छ धुवत राहावेत जेणेकरुन डोळ्यातून आलेल्या स्त्रावाला हात लागल्याने इतरांना संसर्ग होणार नाही. कॉन्टॅक्ट लेन्स वापरणे टाळा. घरात स्वच्छ टॉवेल, रुमाल वापरा. हा आजार फार गंभीर स्वरुपाचा गणला जात नसला तरीही त्याकडे दुर्लक्ष करु नये.



१) डोळे आल्यावर आपण कापूर जाळून धूरी घ्यावी . यामुळे डोळ्यातील घाण बाहेर पडण्यास मदत होते . २) एरंडेल तेल काजळासारखे डोळ्याला लावल्याने डोळ्यातील पु बाहेर पडण्यास मदत होते . ३) चांदीच्या स्वच्छ दागिन्यांना काहीवेळ पाण्यात ठेवावे व मग ते पाणी डोळ्यात थेंबभर टाकल्याने आराम मिळतो .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्याच्याकडे मोठा घण आहे. सोनाराच्या हातोडीचे शंभर फटके आणि याचा एकच दणका बरोबर नाही का ? म्हणून सौ सुनार की और एक लोहार की ही म्हण आठवली.' 'बरोबर आहे मित्रा' सोपानराव म्हणाले. 'बाबा, आम्हीही या म्हणी ऐकल्या होत्या पण त्याचा अर्थ आम्हाला आता स्पष्ट झाला.' पिंकी म्हणाली. सगळे रामूच्या ओट्यावरून खाली उतरले आणि पुढे निघाले. काही अंतरावर एक मुलगा आणि एक मुलगी हातात एक फिरकी आणि आकडा घेऊन एक लांबच लांब दोरी फिरवत होते. ती मुलं साधारणपणे राजेश आणि पिंकीच्याच वयाची होती. राजेश म्हणाला, 'बाबा, ही मुलं काही खेळ खेळताहेत का ?' सोपानरावांना हसू आले, 'अरे पोरांनो, हा खेळ नाही. त्यांना बिचाऱ्यांना आपलं पोट भरण्यासाठी हा उद्योग करावा लागतो. ही मुलं दोर तयार करत आहेत. दोरी, दोरखंड असं ते तयार करतात. मग त्यांचे आईवडील शेजारच्या गावांमध्ये ज्या दिवशी आठवडे बाजार असेल त्या दिवशी विक्रीसाठी घेऊन जातात. फार मेहनत आणि चिकाटी आहे त्यामागे.' 'अच्छा काका. म्हणजे अशा प्रकारे दोर तयार करतात तर ! आम्ही कधी पाहिले नव्हते. कशापासून बनवतात ते दोर ?' पिंकीनं विचारलं. 'तसं तर अनेक वस्तूंपासून दोर तयार करतात. म्हणजे गवत, ताग, कपाशी, लव्हाळे, काथ्या यासारख्या वस्तू वापरल्या जातात. पण आमच्या इथे जवळच मोठं जंगल आहे शिवाय शेती आहे. शेतीच्या बांधावर आणि जंगलात घायपात नावाची वनस्पती उगवते. तिच्यापासून दोर करतात. घायपातला घायाळ, केकती अशी पण नावं आहेत. पण आता या बिचाऱ्यांचा व्यवसाय कमी झाला आहे. लोक त्यांच्याजवळून दोर विकत घेण्यापेक्षा शहरातील दुकानांमध्ये जाऊन माल विकत घेणे पसंत करतात. त्यामुळे असे दोरखंड तयार करणारे कारागीर आता ग्रामीण भागात फार कमी आहेत.' 'काका, किती छान आणि नवीन माहिती मिळाली आम्हाला !' राजेश म्हणाला. 'चला, आता आपण जरा दुसरीकडे जाऊ. मी येथील कुंभार आळीत तुम्हाला नेतो.' सोपानकाका म्हणाले. जवळच्या एका बोळातून ते सगळे मग कुंभार आळीत शिरले. त्या आळीत तीनचार कुंभारांची घरे होती. काही घरांच्या बाहेर माठ रचून ठेवले होते. काही ठिकाणी पाणी भरण्याचे मोठे रांजण होते. कुठे कुठे मातीच्या चुली दिसत होत्या. विविध प्रकारची मातीची भांडी होती. पोळ्यासाठी लागतील म्हणून मातीचे बैल तयार करून त्यांना रंग देणे काही ठिकाणी सुरु होते. एका ठिकाणी एक कुंभार बाबा एका चाकावर झाडांसाठी लागणाऱ्या मातीच्या कुंड्या तयार करताना दिसत होते.'



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

# विचारवंतांच्या विचारांची भूक समजणे कठीण

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.

अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते.



आधुनिक केसरी

## आत्माराम होई | आत्मानंद ||

मनोमनी सारे विठुराया | तुझे रूप ||
येतो रे हुरूप | जगण्याला ||१||
निराशा ग्रासते | आयुष्याला सदा ||
तारी तू गोविंदा | सर्वकाळ ||२||
दांभाकांची स्तुती | सज्जनांचा छळ ||
खेळी कैसा खेळ | आकळेना ||३||
प्रारब्धाचे भोग | भोगीन इमाने ||
दिले श्रीहरीने | आत्मबळ ||४||
माझे मनी भोळा | भाव तुझे ठायी ||
आत्मरूप होई | आत्मानंद ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

सुरथाय त्वया दत्तं राज्यमपेक्षितं पुनः |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
६० || सुरथ राजाला तू अपेक्षित राज्याची पुनर्प्राप्ती करून दिलीस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ज्ञान बोध बिनु भक्ति नहीं, गिरैं भ्रम्म पथ जाहिं। नयनन पट्टी बाँधि कर, चलें अन्धेरे माहिं ।।३१।।(स्वर्वेद चतुर्थ* मण्डल तृतीय अध्याय) ०४/०३/३१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्याप्रमाणे डोळ्यांवर पट्टी बांधून एखादा अंधारात चालतोय, त्याप्रमाणेच ज्ञान-बोधहीन भक्ती, भ्रमरूपी खड्ड्यात नेउन ढकलते. म्हणून ज्ञानाच्या प्रकाशातच भक्ती-पथ पूर्णपणे सुलभ होतो.

..............................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

मित्रांनो आपण मागण्या समासात चार प्रकारच्या आकाशाचा अभ्यास केला. परत त्याची ऊजळणी करून पुढच्या ओळीकडे वळूयात, घटाकाश, मठाकाश, महदाकाश, चिदाकाश. हे ते चार आकाशाचे प्रकार आहेत. त्याच प्रमाणे जीवात्मा, परमात्मा आणि निर्मळात्मा हे जरी स्वतंत्र आहेत असे वाटले तरी सर्व एकचं आहेत.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

चौघांचा मिळून एक आत्मा आहे. घटाला व्यापून असणारे जे आकाश आहे ते घटाकाश होय. त्याच प्रमाणे पिंडाला व्यापून असणारे परब्रह्म त्याला जीवात्मा म्हणतात. मठाला व्यापणारे आकाश ते मठाकाश होय. तर विश्वाला व्यापून असणारे जे परब्रह्म त्यास शिवात्मा म्हणतात. तर मठाबाहेर असणारे जे आकाश ते महदाकाश होय. तर विश्वाच्या बाहेर जे परब्रह्म आहे त्यास परमात्मा म्हणतात. कोणत्याही मर्यादा नसलेले उपाधि नसलेले जे आकाश आहे ते चिदाकाश होय. तर कोणत्याही उपाधी पासून वेगळे असणारे जे परब्रह्म आहे त्याला निर्मळात्मा किंवा परमेश्वर म्हणतात. घटी,मठी आकाशी ही ऊक्ती जरी योग्य असली तरी आकाश भेदयुक्त भासले तरी ते मूळ अभेद्य आहे. जन्ममरणाच्या यातनेतून सुटण्याचा मार्ग मी तर सतत म्हणते की "मी देह आहे" हा अहम भाव बाजूला ठेवला व दैनिक कर्म करत सत्ता, भौतिक गोष्टींचा हव्यास ह्याला दुय्यम स्थान दिले. सतत सत्कर्म करत जीवन सत्कारणी लावले तर ते परमात्म्याला अतिप्रिय आहे. म्हणून तत्ववादी होऊन सतत सन्मार्गावर चालावे. पुढच्या समासात समर्थ सांगतात की, आत्मा पिंड आणि ब्रम्हांड यांच्या उपाधीने लहामोठा भासतो पण तो मूळ एकचं आहे. तिथे भेदभावाला अजिबात थारा नाही.

# मला कुणाचे दु:ख पाहवत नाही

आधुनिक केसरी

पुष्कळ मंडळी यावीत, आलेल्याला खायला घालावे, आणि भगवंताचे नाम घ्यावे, या तीन गोष्टी मला फार आवडतात. त्या जो करील त्याच्या हयातीत त्याला कधीही कमी पडणार नाही. जो माझ्या स्मरणात प्रपंच करतो, त्याच्या प्रपंचात मी आहे. माझ्या माणसाने प्रपंचात हेळसांड केलेली मला आवडायची नाही. उलट, इतरांच्यापेक्षा त्याने जास्त दक्षता दाखवली पाहिजे. कमी आहे त्याची काळजी न करता, जास्त असेल तर त्याविषयी ममत्व न ठेवता, जो येईल तसा खर्च करतो, तो मनुष्य ते सर्व मला देतो. मला विकत-श्राद्ध घ्यायची सवय आहे. मला स्वतःचा प्रपंच करता आला नाही; पण दुसऱ्याचा मात्र चांगला करता येतो. माझ्याजवळ एकही पैसा नव्हता आणि खाणारी माणसे पुष्कळ होती; पण मी कधीही काळजी केली नाही. मी आजपर्यंत पैशासाठी कुणापुढे जीभ विटाळली नाही. उद्या जर कोणी एक लाख रुपये माझ्या नकळत माझ्या उशाशी आणून ठेवले, तर मी ते विष्ठेसारखे बाजूला सारीन आणि स्वतःच्या श्रमाने चार आणे मिळवून पोट भरीन. मला आवडते की, एक लंगोटी घालावी, मारुतीच्या देवळात राहावे, भिक्षा मागावी, आणि अखंड नाम घ्यावे. हे करायला कोण तयार आहे ? मी आपला नामाचा हट्ट कधी सोडला नाही. मी जरी जास्त गरीबांचाच आहे, तरी मला प्रपंचांत कधी दैन्यपणा आवडत नाही. दुसऱ्याकरता निःस्वार्थीपणाने भीक मागण्याची मला कधीच लाज वाटली नाही. व्यवहारदृष्ट्या माझ्यामध्ये एकच दोष आहे की, मला कुणाचे दुःख पाहवत नाही. माझ्यामध्ये प्रेमाशिवाय दुसरे काही सापडायचे नाही. माझ्यातले प्रेम काढले तर मग ' मी ' नाहीच ! मला फक्त आईच्याच प्रेमाची कल्पना आहे. माझ्याकडे येणाऱ्या माणसाला माहेरी आल्याप्रमाणे वाटले पाहिजे; तो परत जाताना त्याच्या डोळ्यांत पाणी आले पाहिजे. दुसऱ्याला आपला आधार वाटला पाहिजे. मी असून काहीच होत नाही; ज्या गोष्टी घडायच्या त्या घडतच असतात. पण आपण असण्यात एक आधार आहे असे इतरांना वाटावे. माझे आता किती दिवस आहेत कुणास ठाऊक ! मी पुढे असो वा नसो, जे मी सुरुवातीला सांगितले तेच मी शेवटीही सांगतो : तुम्ही कसेही असा पण भगवंताच्या नामाला सोडू नका. रामरायाने तुम्हा सर्वांवर कृपा करावी, ही माझी त्याला प्रार्थना आहे. तुम्ही माझ्यासाठी इतक्या आपलेपणाने कष्ट करता याची जाणीव मला आहे. या कष्टांचा मोबदला रामरायाच तुम्हाला देईल. तुम्ही सर्वजण आनंदात राहा, हा माझा तुम्हा सर्वांना आशीर्वाद आहे. आजचे बोधवचन आहे -२११. माझा असा अनुभव आहे की, जो मनुष्य आपले आहे ते रामाला देतो त्याला राम पुरवतो. श्रीराम समर्थ



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

त्याला एखादी विद्या आली नाही, तर दुसरी कोणती येईल ती शिकवतोच की नाही ? आणि त्याने आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करायला तयार व्हावे म्हणून आपल्याला तळमळ लागतेच की नाही ? तशी परमेश्वर मिळावा म्हणून आपल्याला तळमळ लागली आहे का ? तशी तळमळ लागली म्हणजे तुमचा गुरू प्रत्यक्ष जमिनीतून वर येईल. तो सारखा तुमच्याकरिता वाट पाहात असतो.

सद्गुरूची कामगिरी कोणती ?.... आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात. आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. ?क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

मित्रं प्रीति रसायनं नयनयोः आनंदनं चेतसः |
पात्रं यत् सुखदुःखयोः सह भवेत् मित्रेण तद्दुर्लभम् ||
अर्थ : मित्र हा प्रेमरसात घोटलेल्या दिव्यौषधींसारखा , डोळ्यांना व हृदयाला आनंद देणारा असतो. तो सर्व सुखदुःखामध्ये सोबत असतो. मात्र असा मित्र काहीसा दुर्लभ असतो....

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ८ ऑगस्ट २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


## मण्यारच्या दंशानंतरही चिमुकल्याची मृत्यूशी झुंज यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आपल्याकडे 'देव तारी त्याला कोण मारी' अशी म्हण आहे. असाच काहीसा प्रकार दीड वर्षाच्या कान्हा सोबत घडला. रात्री अतिविषारी मण्यारने दंश करूनही तो सुखरूप आहे. चोवीस तास त्या कोवळ्या जीवाची मृत्यूशी झुंज सुरू होती. एकीकडे डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न तर दुसरीकडे कुटुंबाने केलेला देवाचा धावा कामी आला, अन त्या कोवळ्या जिवाने मृत्यूशी लढाई जिंकली. मरणाच्या दारातून परत आलेल्या 'कान्हा पवार' या चिमुकल्याची सध्या परिसरात चर्चा होत आहे.

वंजारवाडी ता.नांदगाव येथील यादव कारभारी पवार शेतात कुटुंबासह वास्तव्यास आहेत. त्यांचा मुलगा योगेश आणि स्नुषा पूजा या दाम्पत्यास कान्हा नावाचा गोंडस दीड वर्षांचा मुलगा आहे. दि.०२ ऑगस्ट रोजी रात्रीचे जेवण झाल्यानंतर पूजा हिने कान्हास झोपी लावले. दिवसभर शेतात काम करून पवार कुटुंबीय देखील लवकर झोपी गेले. रात्री साडे अकराच्या सुमारास अचानक कान्हा मोठ्याने ओरडून रडू लागला. पूजा हिने त्यास जवळ घेतले असता तिला कान्हाचा उजव्या हाताचा



अंगठा सापाच्या तोंडात असल्याचे दिसले. ते दृश्य बघून भेदरलेली पूजा जोरात किंचाळली. त्यामुळे सर्व कुटुंब जागे झाले. कान्हाला सर्पदंश झाल्याचे लक्षात त्यास तातडीने मनमाड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी प्राथमिक उपचार करून मालेगाव येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. परंतु, दि.०३ दुपारी तीन वाजता कान्हाची शुद्ध हरपली. प्रकृती क्षणक्षणाला खालवत असल्यामुळे पवार कुटुंबाची धास्ती वाढली. त्यामुळे कान्हास नाशिक येथील साफल्य बालरुग्णालय येथे दाखल केले. कृत्रिम श्वासोच्छ्वासावर असलेल्या कान्हावर डॉ.अभिजित सांगळे यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू झाले. या कालावधीत अँटी स्नेक बाईटचे तब्बल सत्तावीस डोस देण्यात आले. अखेर दि.०४ सायंकाळी सहा वाजता त्यास शुद्ध आली. त्यानंतर देव पाण्यात ठेवलेल्या पवार कुटुंबाने सुटकेचा निःश्वास सोडला. मण्यार या भारतातील सर्वांत विषारी सर्पाने दंश केल्यानंतर रुग्ण वाचण्याची शक्यता फारच कमी असते. परंतु, डॉक्टरांनी केलेले शर्थीचे प्रयत्न, कुटुंबाने केलेला देवाचा धावा कान्हाला मृत्यूच्या दारातून परतण्यास कामी आला.

## जेजुरीच्या मल्हारी शासन आले दारी

### हे सरकार सर्वसामान्यांचे सरकार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**जेजुरी :** येळकोट येळकोट जय मल्हार असा जयघोष करून हे सर्वसामान्यांचे सरकार म्हणून सरकार काम करत आहे. हे काम करताना आम्हाला समाधान मिळत आहे. सरकारी काम बारा महिने थांब यात माणूस कंटाळून जातो. आज शासनच आपल्या दारी आल्याने जनतेच्या समस्या सुटत आहे. सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम शासन करत आहे. देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही. सर्वसामान्यांच्या हितासाठी न्यायासाठी हे आपलं सरकार झटत आहे.असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. ते जेजुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात बोलत होते.योजना कल्याणकारी, सर्वसामान्यांच्या दारी असे म्हणत पुरंदर तालुक्यातील जेजुरीच्या मल्हारी दारी,शासन दारी हा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील

विधान परिषदेचे उपसभापती नीलम गोरे,माजी मंत्री विजय शिवतारे, आ.संजय जगताप, दत्तात्रय भरणे, राहुल कुल, माजी आमदार अशोकराव टेकवडे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील,पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, अशोक पवार, शरद सोनवणे व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या राज्य गीताने करण्यात आली. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी जेजुरी गडावर जाऊन दर्शन घेतले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. कार्यक्रम स्थळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, येत्या काळात महिला बचत गटातून जास्तीत जास्त महिलांचे सक्षमीकरण करणार आहोत. ज्या घरी मुलगी जन्माला येईल त्या घरी १ लाख दिले जातील. मुलींना साठी अनेक योजना शासन करणार आहे. शेवटच्या घटकांपर्यंत योजना घेऊन जाणार आहोत.यावेळी पुणे जिल्ह्यातून विविध शासकिय व प्रशासकीय विभागातील अधिकारी, विविध गावांतील सरपंच तसेच महायुतीतील घटक पक्षाचे नेते मंडळी पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मुख्यमंत्री जनकल्याण निधीचे समन्वयक डॉ. अमोल शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना लाभार्थींना तसेच व्यवसाय करण्यासाठी विविध योजनांचे कर्ज वाटप म्हणून चेक देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. प्रशासनाकडून कडून विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




**मोदीच्या नेतृत्वाला सर्वांनी प्रतिसाद द्यावा :उपमुख्यमंत्री अजित पवार**

या भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, मार्तंड देवस्थानाच मुद्दा यासारखे अनेक प्रश्न सुटण्यासाठी प्रयत्नशील आहोत .महाराष्ट्राच्या विकासाची गाडी भरधाव जाण्यासाठी केंद्र सरकारची जोड मिळालेली आहे .त्यामुळे राज्याची प्रगती पुढे जात आहे .हे सरकार कोणाला ही वाऱ्यावर सोडणार नाही .मोदीच्या नेतृत्वाला सर्वांनी प्रतिसाद द्यावा असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले .

## आत्महत्या करणाऱ्या शेतकरी महिलेस जगण्यास केले प्रेरित

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील धामणगाव येथे हरणाचा उपद्रव वाढला असुन कोवळ्या पिकांची नासाडी करत आहे.हरणाच्या उपद्रवामुळे हैराण झाले आहेत. आधीच नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर वन्य प्राण्यांपासून संरक्षण देण्याची मागणी करण्याची वेळ आली आहे. सध्या शेतात कोवळी पिके उभी आहेत, ती फस्त करण्याचा हरणांच्या कळप फिरत आहेत धामनगाव येथील महिला शेतकरी रंजना ताई पल्हाळ यांचा रनरागिनी महिला शेतकरी गटाच्या सदस्य आहेत मनिषा ताई गोरे व उषाताई गोरे यांनी राळेगण येथून प्रशिक्षण घेऊन आल्या त्यांनी गट स्थापन केला, गावात शिवार फेरी ग्रामसभा घेऊन एकत्र पणे बियाणे खरेदी केले . रनरागिनी महिला शेतकरी गटाच्या सदस्य रंजना पल्हाळ यांना दिड एकर कोरड वाहु शेती आहे पती पत्नी रोज मजुरी करून कुटंबाचा गाडा चालवतात त्यांनी गटाच्या माध्यमातून कपाशी पिकाची लागवड केली, कपाशीचे पिक चांगले आले परंतु लागवड केल्यानंतर पंधरा दिवसात च दहाविस हरणाच्या कळपाने सर्व कपाशीचे पिक फस्त केले. शेत विकून टाकण्याचा मनात विचार येऊ लागला कि जिवन संपावे असे मनात वेगवेगळे विचार येऊ लागले, परंतु गटातील महिलांनी त्यांची समजूत काढली परत त्यांना खत बियाणे खरेदी करून दिली, परत जोमाने कामला लागले. परत नशीबाने साथ दिली नाही परत हरणांनी सर्व पिक खाल्ले. परत नैराश्य आले परत गटातील महिलांनी शेतावर जाऊन गटामार्फत त्यांच्या शेताला तार कुंपण करुन दिले. हि बाब पाणी फाऊंडेशन चेतालुका समन्वयक ज्ञानेश्वर ईधाटे यांना कळली यांनी ति बाब पाणी फाऊंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद अरसुल,उमेद मिशन ब्लॉक मँनेजर सुनिल बारबैले,कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, यांना कळवले यांनी अशा गटाला भेट देण्याचे ठरवले.

## जयप्रभा स्टुडिओ ताब्यात घेण्याचा शासनाचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** ऐतिहासिक जयप्रभा स्टुडिओ वाचवण्याच्या मागणीसाठी चित्रपट कलाकारांनी सुरू केलेल्या लढ्याला यश आले आहे. राज्य शासनाने स्टुडिओ ताब्यात घेण्याबाबत दोन प्रस्ताव कोल्हापूर महापालिकेस पाठवले असल्याने या प्रश्नावरील तोडगा दृष्टीपथात आला आहे. या निर्णयाचे कलानगरीत साखर, पेढे वाटून शनिवारी स्वागत केले. कोल्हापूरची चित्र अस्मिता म्हणून जयप्रभा स्टुडिओ ओळखला जातो. या स्टुडिओच्या जागेची विक्री महालक्ष्मी स्टुडिओ एलएलपी फर्मला झाल्यानंतर कोल्हापुरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. स्टुडिओ शासनाने ताब्यात घ्यावा या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. या प्रयत्नास यश आले आहे. नगर विकास विभागाने स्टुडिओच्या जागेबाबत दोन पर्याय कोल्हापूर महापालिकेस दिले आहेत. स्टुडिओच्या जागेच्या मोबदल्यात श्री महालक्ष्मी स्टुडिओ एलएलपी फर्म यांना पर्यायी जागा परस्पर सहमतीने उपलब्ध करून देऊन ही जागा ताब्यात घ्यावी. तर दुसऱ्या पर्यायानुसार वारसा हक्क स्थळ जागेच्या संपादनाच्या मोबदल्यात उर्वरित जागेत जमीन मालकास बांधकामास प्रमाणके देऊन विकास हस्तांतरण हक्क ( टीडीआर ) उपलब्ध करून द्यावा, असे पर्याय दिले आहेत. या निर्णयाचे जयप्रभा स्टुडिओ बचाव समितीने जल्लोषी स्वागत केले.


## वाशिम रेल्वे स्थानकाचा होणार कायापालट

### खासदार भावना गवळी यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**दिनकर गडदे**

**अनासिंग ( वाशिम ) :** वाकाटक राजाची



राजधानी असलेले तेव्हाचे वत्सगुल्म म्हणजेच आत्ताचे वाशिम. या शहराला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. अकोला हैदराबाद महामार्गावर असलेले हे शहर विदर्भ प्रदेशातील एक महत्त्वपूर्ण शहर आहे. खा. भावना गवळी यांच्या प्रयत्नातून वाशिम वरून जाणाऱ्या नॅरो गेज रेल्वे मार्गाचे ब्रॉड गेज रेल्वे मार्गात रूपांतर झाले असल्याचे सर्वश्रुत आहेच, आणि आता देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या अमृतभारत योजनेतून खासदार भावना गवळी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे २० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असून, सदर निधीतून वाशिम रेल्वे स्थानकाचा कायापालट होणार आहे.




वाशिम शहराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून खासदार भावना गवळी यांचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. त्यांनी रेल्वे मंत्रालयाकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे २० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असून, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ६ ऑगस्ट रोजी ऑनलाईन पद्धतीने सदर योजनेचा शुभारंभ झाला आहे. देश झपाट्याने प्रगतीच्या शिखरावर पोहोचत असताना वाशिम जिल्हा विकासाच्या बाबती मागासलेलाच असल्याची खंत खासदार गवळी यांनी अनेक वेळा संसदेत व्यक्त केली होती. परिणामी त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेऊन अखेर रेल्वे मंत्रालयाने पंतप्रधानांच्या अमृतभारत योजनेत वाशिम रेल्वे स्थानकाचा समावेश केला आहे. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वाशिम रेल्वे स्थानकावरून अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या जात असल्यामुळे येथे रेल्वे प्रवाशांची नेहमीच लक्षणीय वर्दळ असते. परंतु प्रवाशांना पाहिजे तशा सोई सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांमधून नाराजीचा सूर ऐकावयास मिळत असे. खासदार भावना गवळी यांनी खेचून आणलेल्या २० कोटी रुपयाच्या निधीतून वाशिम रेल्वे स्थानकातील पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासोबतच येथील इमारतीचे नूतनीकरण, परिसरात सुशोभीकरण, विद्युतीकरण, प्रशस्त वेटिंग हॉल, पार्किंग व्यवस्था आदी सुविधा अद्यावत केल्या जाणार असल्याने, लवकर वाशिम रेल्वे स्थानक हायटेक होणार आहे. रेल्वे स्थानकाचे रूप बदलणार असल्याने प्रवाशा मधून समाधान व्यक्त केल्या जात आहे.

# विश्वचषकाचे काऊंटडाऊन

आधुनिक केसरी

भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. प्रत्येक संघांनी विश्वचषकाची तयारी सुरु केली आहे. याच विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियाने आपल्या 18 सदसीय संघाची घोषणा केली आहे. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाली ऑस्ट्रलिया संघात काही नव्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. विश्वचषकाला 5 ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना 8 ऑक्टोबर रोजी भारताविरोधात होणार आहे. ऑस्ट्रेलियाने युवा तनवीर सांघा याला 18 जणांच्या स्कॉडमध्ये स्थान दिलेय. आयसीसीच्या नियमांनुसार, विश्वचषकात सहभागी होणाऱ्या सर्व संघाना 28 सप्टेंबरपर्यंत अंतिम 15 खेळाडूंची नावे द्यायची आहेत. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे प्रमुख निवडकर्ते जॉर्ज बेली यांनी 18 जणांच्या स्कॉडची निवड केली आहे. वनडे विश्वचषकात ऑस्ट्रेलिया संघाचे नेतृत्व पॅट कमिन्स करणार आहे. 18 जणांच्या संघामध्ये मार्नस लाबुशेन याला संधी दिलेली नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दिलेल्या माहितीनुसार, 18 खेळाडूंमधून विश्वचषकासाठी 15 जणांची निवड करण्यात येणार आहे. इतर खेळाडूंना बॅकअप म्हणून ठेवण्यात येणार आहे. विश्वचषकात ऑस्ट्रेलियाचा संघ मार्नस लाबुशेनशिवाय उतरणार आहे. आयपीएलआधी भारतात झालेल्या वनडे मालिकेत लाबुशेन ऑस्ट्रेलिया संघाचा सदस्य होता. पण आता विश्वचषकात त्याला संधी दिलेली नाही. ऑस्ट्रेलियाच्या संघात डेविड वॉर्नर आणि जोश हेजलवूड यांचे पुनरागमन झालेय. 5 ऑक्टोबर ते 19 नोव्हेंबर यादरम्यान भारतामध्ये यंदाचा विश्वचषक होणार आहे. पहिला आणि अखेरचा सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडिअममध्ये होणार आहे. ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना 8 ऑक्टोबर रोजी भारताविरोधात होणार आहे. विश्वचषकाचे काऊंटडाऊन सुरु झालेय. यंदाचा विश्वचषक दहा संघामध्ये राऊंड रॉबिन पद्धतीने रंगणार आहे. यंदाच्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाच्या संघाला विजयाचा दावेदार म्हटलेय जातेय. ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत पाच वेळा वनडे विश्वचषकावर नाव कोरलेय. 1987, 1999, 2003, 2007 आणि 2015 मध्ये ऑस्ट्रेलियाने टी 20 विश्वचषक उंचावला आहे. विश्वचषकासाठी निवडण्यात आलेला ऑस्ट्रेलियाचा 18 सदसीय संघ - पॅट कमिन्स (कर्णधार), सीन एबॉट, एश्टम एगर, ॲलेक्स खॅरी, नॅथन एलस, कॅमरुन ग्रीन, एरॉन हार्डी, जोश हेलवडून, ट्रेविस हेड, जोश इंग्लिंस, मिचेल मार्श, ग्लेन मॅक्सवेल, तनवीर सांघा, स्टिव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क, मार्कस स्टॉयनिस, डेविड वॉर्नर, ॲडम झाम्पा.

# बौद्धांनी मंदिरांवर दावा केला तर...



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**बौद्धांनी अर्थात समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, यावर विश्वास ठेवून अंधविश्वास, पाखंड, थोतांड पायदळी तुडवणारे सर्व जाती धर्मातील वैचारिक लोक या अर्थाने बौद्ध हा शब्दप्रयोग केला आहे. कारण कोणतीही परिवर्तनाची मशाल पेटवायची असेल तर माणसाला माणसापासून दुर कर करणाऱ्या जाती कधीच ठिणगी पाडू शकत नाहीत. परिवर्तनाची मशाल पेटवून अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधविश्वासातून विज्ञानाकडे जायचे असेल तर सर्वात महत्वाचा घटक आहे तो म्हणजे केवळ आणि केवळ विचार. विचाराच्या जोरावरच क्रांती होऊ शकते. म्हणून तर आम्ही फुले शाहु आंबेडकर यांची विचारधारा हि पुरोगामी व परीवर्तनशील विचारधारा म्हणून सामाजिक क्रांतीचे नायक म्हणून फुले शाहु आंबेडकर यांना नतमस्तक होतो.**

फुले शाहु आंबेडकर यांचे नाव घेताना काही दिड शहाण्यांच्या डोक्यात प्रश्न येतो यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव का नाही घेतले जात नाही. तर मुळात फुले शाहु आंबेडकर यांची नावे ते वेगवेगळ्या जातीतील आहेत म्हणून घेतली जात नाहीत तर ते एका विचारसरणीचे आहेत म्हणून घेतले जातात. आणि ही विचारधारा महात्मा फुले शाहु महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांनी सलग ज्वलंत ठेवली. म्हणुन बोलताना फुले शाहु आंबेडकर असा उल्लेख संपूर्ण पुरोगामी विचारसरणीच्या महानायकांच्या वतीने केला जातो. आणि ज्यांना धर्माच्या जास्तच बेगडी गर्व असेल त्यांनी छत्रपती शाहुमहाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचेच वंशज आहेत हे लक्षात घ्यावे. इतिहासाची पाने न चाळता व्हाट्सएप वरून विद्वान होता येत नाही. असो मुळ मुद्दा हा आहे की भारतामध्ये धर्माला, जातीला व विषमतेला बाजूला सारून माणुस व माणसाच्या कर्माला महत्व देऊन सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक ज्ञात अज्ञात महापुरुषांनी आपले आयुष्य खर्ची घालून धर्मांधता, थोतांड, पाखंड व विषमता हाणून पाडली. परंतु काही लोकांचे पोटच हे धर्मांधता, पाखंड, विषमता व अंधविश्वास यावर असल्याने ते आजही या गोष्टी माणसाच्या डोक्यात पेरण्याचा प्रयत्न करत आहेत. धर्मापेक्षा कर्माला महत्त्व असायला पाहिजे, प्रजासत्ताक देशात कोणत्याही धर्माला कोणतेही महत्त्व दिलेले नसताना मात्र धर्मनिरपेक्ष देशात सरकारकडून च धर्माच्या नावाचा वापर करून राजकारण केले जात आहे. धर्माच्या नावावर राजकारण करणारे लोक हे जनकल्याण व लोकशाही चा सन्मान कधीच करू शकत नाहीत. एवढेच नाही तर धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, पाखंड, थोतांड, विषमता व द्वेष पसरवणाऱ्या मनोविकृत लोकांना सरकार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संरक्षण देत आहे. यामुळे देशात धार्मिक कट्टरता वाढून लोकशाही ची मुल्य पायी तुडवली जात आहेत. सराकरच जर धार्मिक कट्टरतेच्या गोष्टी करेल, धार्मिक द्वेष पसरवण्यासाठी इतर धर्मातील लोकांना कमी लेखून तिरस्कार करेल, इतिहासाचे विद्रुपीकरण करून मांडणी करून धार्मिक कट्टर लोकांना खुश करण्याचा प्रयत्न केला जात असेल तर लोकशाही आहेच कुठे हा प्रश्न निर्माण होतो. म्हणुन सरकारने ने धर्म व धार्मिक अंधविश्वास, पाखंड, थोतांड, विषमता याला पाठीशी घालून राजकारण न करता धर्मनिरपेक्ष राजकारण करणे, व वैज्ञानिक दृष्टिकोन देऊन देशाची सर्वांगीण प्रगती करणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. परंतु सरकार धार्मिक कट्टरता, द्वेष पसरवणाऱ्यांना संरक्षण देऊन धार्मिक राष्ट्रांचा अजेंडा राबवत आहे. मशीदीमध्ये मंदिर शोधन्याचा प्रयत्न सुरू आहे. हे केवळ द्वेष आणि धार्मिक कट्टरतेसाठी सुरू आहे. अनेक धर्मांध लोक मंदिर पाडून मशीदी बांधल्या गेल्याचे आरोप करून धार्मिक विषमता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. जर मंदिर पाडून मशीद बांधने चुकिचेच आहे. अशी आपण न्यायीक बाजु घेतली आणि तर ज्यांना असे वाटते कि मंदिर पाडून मशीद बांधली गेली ते लोक मंदीरात बुद्धमुर्ती दिसुनही हे बुद्ध विहार आहे असे बोलत नाहीत. याला काय म्हणावं? प्रामाणिक पणा माणसाच्या अंगी असने हे संस्काराचे लक्षण आहे. परंतु मशीद मध्ये मंदिर दिसणाऱ्यांना बुद्धमुर्ती दिसुनही जर ते बौद्धविहार दिसत नसेल तर हे माणसीक अपंगत्व आहे.

याचा इलाज कोणत्याही हॉस्पिटलमध्ये करणे शक्य नाही. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात बुद्धाचे विहारे व स्तूप बांधण्यापूर्वी देव नेमके होते तरी कुठे? विहारातील बुद्ध मुर्तीलाच विद्रुप करून तेथे शंकराच्या मुर्त्या स्थापल्या असे प्रबोधनकार ठाकरे अभ्यासाअंती मत मांडून मंदिर केवळ पोटभरण्याचे साधन बनवले गेले असे परखड मत मांडतात. बुद्धाच्या अगोदर भारतात कुठेही मंदीराचा पुरावा आढळत नाही असेही प्रबोधनकार ठाकरे हे ठणकावून सांगतात. आजही अनेक ठिकाणी बुद्ध मुर्तीलाच रंगोटी करून, वेगवेगळे अलंकार चढवून देव म्हणून पुजले जात आहे. आणि असे अनेक प्रकरणे जेव्हा न्यायालयात गेले तर अनेक वेळा न्यायालयाने ते बौद्ध विहार आहे. तेथे देव समजून कोणतीही धार्मिक पुजा अर्चा करण्यावर बंदी घातली. बालाजी मंदिर, विठ्ठल मंदिर असे अनेक पुरातन मंदिर हे जुने बुद्ध विहारेच आहेत याचे अनेक पुरावे आजही उपलब्ध आहेत. लेण्याची रचना, व मंदीरावरील कोरीव काम आतमधील मुर्ती बुद्धा शी मिळती जुळती आहे. अनेक देव्यांच्या मंदिरात बुद्ध मुर्ती असल्याचे सिद्ध झाले आहे. थोडक्यात काय तर सरकारने जर सत्ता मिळवण्यासाठी धर्माचा आधार घेऊन द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला. धार्मिक राष्ट्रासाठी जर मंदीरावर जास्त भर दिला आणि देशातील वैचारिक बौद्धांनी जर सर्व जुन्या मंदीराचे पुरातत्व खात्याकडून चौकशी केली तर ते बुद्ध विहारच निघेल. हि बाब मंदिरात बसलेल्या पुजाऱ्यांना चांगली माहिती आहे. परंतु भक्तांना हि बाब पचणारी नाही. म्हणून तर जुन्या मंदीराच्या गाभाऱ्यात आजही पुजारी सोडून इतरांना जाऊ दिले जात नाही. सर्व जन देवाची लेकरं माणली जाते. मग सर्वांना मंदीराच्या गाभाऱ्यात जाण्याचा अधिकार का नाही? सर्वांना गाभाऱ्यातील मुर्तीला स्पर्श करण्याचा अधिकार का नाही? एकीकडे विषमता व जातीवाद संपला म्हणायचे परंतु गाभाऱ्यात जाऊ द्यायचे नाही. ज्यांना गाभाऱ्यात जाता येत नाही त्यांना दानपेटीत मात्र पैसे टाकलेले सर्वांना चालतात. असो हा विषय त्या धर्माचा आहे. परंतु जर पुरातत्व चौकशी झाली आणि जुन्या मंदीराला बुद्ध विहार म्हणून घोषित केले तर धर्म धोक्यात येईल की नाही माहिती नाही परंतु अनेकांची पोट भरण्याचे धंदे मात्र बंद होतील.

म्हणून विहारांना मंदीरे बनवून लोकांची माणसिक पिळवणूक करून स्वतः चे पोट भरणाऱ्यांनी तरी जागृती करायला पाहिजे धर्माच्या नावावर मते माघू नये व धार्मिक कट्टरता पसरवू नये कारण अति केल्याने माती होत असते. धर्म मंदिर धर्म मंदिर करता करता मंदिरात विहार निघाले की पंचायत होते. कोणत्याही गोष्टी चा अतिरेक हा विनाशाकडेच नेत असतो. अतीप्रमाणात देव शोधता शोधता बुद्धच सापडतात ही वस्तू स्थीती कोणी ही नाकारू शकत नाही. म्हणुन देशात कायदा व सुव्यवस्था नांदवायचा असेल तर सरकारने धर्माच्या नावावरची अराजकता थांबवायला पाहिजे. मंदिरात मशीद शोधुन द्वेष पसरवल्यापेक्षा आहे तसे ठेवून लोक कल्याणाचे काम करावे. धार्मिक कट्टरता व धर्माच्या नावाने मत मागता मागता आपले कर्म मात्र धर्मविरोधी करू नये. धर्मीक कट्टरतेच्या नावाखाली विकृती व तिरस्कार पेरला जातो. मग ज्या धर्मात विकृत व तिरस्कार असेल तो धर्म माणसांचा असुच शकत नाही. बुद्धांनी दिलेला शांततेचा मार्गच जगाला व माणसाला तारू शकतो. म्हणुन व्हाट्सएप युनिव्हर्सिटी द्वारा जो धर्माचा आणि मंदिरा अभ्यासक्रम लोकांना भावनिक बनवून डोक्यात पेरला जात आहे. तो पेरताना धर्मांध लोकांनी काळजी घ्यावी. कारण कारण धर्मांधांनी कितीही द्वेष, विषमता पेरून मशीदीमध्ये मंदिर शोधण्याचा प्रयत्न केला तर वैचारिक बौद्ध लोक मंदीराचे कधी विहारे करतील आणि तेही शासणाच्या मदतीने पुराव्यांनीशी हे कोणालाच कळणार नाही. म्हणून ज्याला कोणाला धर्माचा गर्व व धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या विषमता, द्वेष पसरवणाऱ्या बाबी आवडत असतील त्यांनी त्या खुशाल स्वतः च्या घरामध्ये अंगीकाराव्यात. कोणत्याही धर्माला सार्वजनिक ठिकाणी आणु नये. अनेक शासकीय कार्यक्रमात धर्मांध लोक धार्मिक घोषणाबाजी करतात. सरकारने ने हे वेळीच थांबवायला पाहिजे. नाहीतर जे लोक धर्माच्या नावाखाली आज थोड्या अधिक प्रमाणात अराजकता निर्माण करत आहेत तेच लोक निवडणूक च्या वेळी जातीय दंगीलीत गुन्हेगारी होतील. धर्माला कर्माची माणसे पाहिजे की गुन्हेगारी ची ही बाब समजून घेणे आवश्यक आहे. आणि ज्यांना कोणाला काही करायचे असेल तर त्यांनी धर्माच्या नावाखाली खुशाल आपल्याला घरात करावे. कारण ते करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिलेला आहे. परंतु सार्वजनिक ठिकाणी धार्मिक उन्माद माजवून शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जात असेल, धर्म आणि धार्मिक बाबींना माणसापेक्षा जास्त वाव देऊन अराजकता निर्माण होत असेल तर तेव्हा मात्र मंदीरातील बुद्ध उघड करून देशात शांती सोबत नवीन क्रांती होईल. म्हणून एवढाही अतिरेक करू नका की बौद्ध लोक मंदीरावर दावा करतील आणि पुराव्यानिशी बुद्ध शोधतील. तेव्हा मात्र धर्मांधांची खुप अडचण होईल. म्हणून कोणतीही गोष्ट मर्यादित केलेलीच योग्य असते. देश माणुस व माणसुकीचे हित जोपासणारा धर्म असतो. विषमता द्वेष पाखंड अंधविश्वास व माणसिक गुलामी देणारा धर्म नाही तर ती पोटभरण्याची व वर्चस्व ठिकवण्याची व्यवस्था आहे. हि सर्व व्यवस्था उद्धस्त होऊ शकते जर बौद्धांनी मंदिरावर दावा केला तर...

# दुर्गुण हे सहज स्वीकारले जातात



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**प्रत्येक युगाचा विशेष असं लक्षणं असतं विद्यमान युग ज्याला आपण कलयुग संबोधतो या कालयुगाच देखिल प्रमुख लक्षण हेच आहे कि दुर्गुणांचा प्रचंड आकर्षण या युगात आपल्याला सगळीकडे थैमान घालताना दिसत आहे. जीवनातील चांगल्या वाईट बाबी ह्या प्रत्येकाला समजता असतात तरी सुद्धा चांगल्या बाबी पेक्षा वाईट बाबींच आकर्षण जास्तच असतं हे जगातील सगळ्यात मोठे आश्चर्य म्हटले तरी वावगे ठरणार नाही. समाजिक पातळीवर पाहिलं तर वयोगट कोणताही असो त्या त्या वयोगाटात दुर्गुणांचा आकर्षण हे प्रमुख लक्षण दिसतच. साधारणता दहा पंधरा वर्षं वय होईपर्यंतची लहान मुलं वगळली तर प्रत्येकाला चांगलं काय वाईट काय आपल्या फायद्याचे काय नुकसान दायाक काय हे कळत पण वळत नाही.**

असंच म्हणावं लागेल कारण चांगल्या हितकारक बाबी शिकवाव्या लागत. परंतु ज्या बाबींमुळे आपलं अहित होणार आहे ते माहित आहे. शिकावायला कोणी नाही तरी आपण त्या सहज आत्मसात करतो. स्वतःच्या जीवनाचे कल्याण होण्यासाठी उपयोगी असणारे सद्गुण व सदाचार हा आपल्याला शिकावाव लागतो. मात्र ज्या वाईट घडत ते अवगुण मात्र आपोआप आत्मसात होतात हे सध्याच्या काळातील सगळ्यात भायनक असं वास्तव आहे. सृष्टीवरील सगळे चांगले सदगुण सात्विक हितकारक बाबी ह्या शिकवण्यासाठी कोणीतरी मार्गदर्शक म्हणून प्रयत्न करत असत .तरी सुद्धा अनेक वेळा शिकावले तरी त्या बाबी आत्मसात होताना अडचणी येतात आणि यदाकदाचित त्या आत्मसात झाल्या तरी त्या टिकवून ठेवण्यासाठी सुद्धा नियमित प्रयत्न कारावे लागतात. हितकारक बाबींसाठी अनेक मार्गदर्शक वेगवेगळे धार्मिक ग्रंथ तत्वज्ञान वेळेनुरूप अनेक महापुरुष कार्य करत असतात .तसेच समाजाच्या पातळीवर सुद्धा कुटुंबा पासुन अनेक घटक यासाठी कार्यरत असतात. या उलट वाईट अहितकारक कार्य करण्यासाठी मात्र कोणत्याही प्रकारच मार्गदर्शक तत्वज्ञान असं काहीही लागत नाही अहितकारक कार्यचा कोणी मार्गदर्शक आहे असं आपण कधी ऐकलं आहे का? अगदी सहज चालता बोलता आपण वाईट बाबी आत्मसात करतो आणि म्हणूनच अवगुण प्राप्त करण्यासाठी कोणी विशेष प्रयत्न केल्याचं आज पर्यंत तरी ऐकिवात नाही. कारण वाईटाच आकर्षण जास्त प्रमाणात असत. बहुतांश लोक अहितकारक बाबीच आत्मसात करतात हे दुर्दैव आहे. मानवी जीवन आणि जीवनातील काही दैनंदिन बाबी ज्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपल्या जीवनातील परिणामांना प्रभावित करत असतात यातील काही बाबी ह्या हितकारक असतात तर काही अहितकारक असतात. जीवनातील कल्याणकारी बाबी ह्या करण्यासाठी मन बुद्धी यावर वारंवार नियंत्रण प्रस्थापित कराव लागत. आपण सजग असतो. तरी सुद्धा आपण कधी रस्ता चुकतो आणि अहितकारक बाबी आपण किती सहजपणे अंगिकारतो ते कळत सुद्धा नाही. कारण अहितकारक बाबींच आपल्यला किती प्रचंड प्रमाणात आकर्षणं असतं किती उत्सुकता असती किती गोडी असते. अगदी आयुष्याची वाट लागली तरी चालेल पण अहितकारक बाबींच आकर्षण आपण सोडत नाही. जीवनाच वाटोळं करणाऱ्या बाबी ह्याच आपल्यला योग्य वाटतात चांगल्या वाटतात या पेक्षा वाईट बाब काय असु शकते आणि म्हणूनच अहितकारक बाबींच प्रचंड आकर्षण हे सध्याच्या काळातील सगळ्यात मोठे आश्चर्य आहे. तसं पाहिलं तर आकर्षण हा मानवी स्वभावाचा मुख्य गुण दोष असतो. पण यामध्ये सुद्धा चांगल्या, सात्विक, धर्म शास्त्रानुसार मान्य बाबी, सद्गुणी, समाज हितकारक, लोक उपयोगी, सदाचारी बाबींचा आकर्षण असल पाहिजे. पण जीवनातील कल्याणासाठी आवश्यक अशा ह्या बाबी सहजासहजी कोणीही स्वीकारत नाही. त्यासाठी अनेक घटक सक्रिय प्रयत्न करत असतात. तरी सुद्धा लोक या मार्गावर स्व इच्छेनुसार फार कमी प्रमाणात सहभागी होतात आणि सहभागी झाल्यानंतर सुद्धा वांरवार मार्गदर्शन उपयोगी साहित्य विचार प्रवाह सुविचार आणि चांगल्या बाबींच मार्गदर्शन करणारे अनेक दृश्य अदृश्य मार्गदर्शक असताना सुद्धा त्यापैकी खुप कमी लोक शेवटपर्यंत या मार्गावर टिकतात. चांगलं वागण्यासाठी चांगलं घडण्यासाठी जगातील सगळे मार्गदर्शक तत्वज्ञान धर्म ग्रंथ साहित्य प्रयत्नशील असतात .तरी सुद्धा या मार्गावर लोकांना ओढुन ताणून आणावं लागतं हे दुर्दैव महणाव लागेल. परंतु यांच्या उलट समाज विघातक, धर्म शास्त्रानुसार अमान्य, बाबी तसेच स्वतःच व कुटुंबांचे नुकसान होईल अशा अहितकारक बाबींच्या अनुषंगाने कोणीही मार्गदर्शक नसताना तसेच वाईट बाबी संदर्भात कुठलंही तत्वज्ञान उपलब्ध नसताना विना मार्गदर्शक अहितकारक मार्गावरून बहुतांश लोक किती व्यवस्थित आणि शेवटच्या टप्या पर्यंत सुद्धा सहज प्रवास करतात ह्या वाईट बाबींच आकर्षण किती सहज किती विराट असत त्यासाठी कुठलेही विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. हे जगातील सगळ्यात मोठे आश्चर्य म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. चांगलं कार्य करण्यासाठी वारंवार सांगावे लागते. पण वाईट हे रूचकर असल्याने अहिताचे कार्य करण्यासाठी कुणीही मार्गदर्शन नसल तरी देखील मृगजळ पाहुण माणसं तिकडं च फिरवतात म्हणजे एकंदरीत वाईट बाबी किती गोड मधुर आणि फायदेशीर वाटतात. म्हणून त्याच आकर्षण जास्त प्रमाणात असत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मणिपूर हिंसाचारावर पंतप्रधानांचे मौन का ?

आधुनिक केसरी न्यूज

**कडेगाव :** मणिपूर जळत असून गेल्या सहा महिन्यात पासून मणिपूर मध्ये जाती धर्माच्या नावाखाली दंगली सुरू आहेत ती देशासाठी लांच्छनास्पद अशीच गोष्ट आहे मणिपूर हिंसाचारावर पंतप्रधानाचे मौन का ? मणिपूरला भेट देण्यासाठी पंतप्रधान मोदींना वेळ नाही महिला सक्षमीकरण हे नावापुरते न राबवता प्रामाणिकपणे राबवली पाहिजे, असे मत स्वामी स्वामीनाथन आयोगाचे सदस्य मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय नेते अतुल कुमार अंजान यांनी व्यक्त केले. विटा ( ता. खानापूर )येथील क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापीठाच्या वतीने ' क्रांतिसिंह नाना पाटील सामाजिक पुरस्कार ' अतुलकुमार अंजान यांना प्रदान करण्यात आला. शाल , श्रीफळ , मानपत्र, स्मृतिचिन्ह, रोख वीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी भालचंद्र कानगो होते. कम्युनिस्ट पक्षाचे नेते सयाजी पाटील ( सातारा ) व्ही.वाय.पाटील , प्रा. पांडुरंग शितोळे , ॲड. सुभाष पाटील, अध्यक्ष सुभाष पवार , प्रा. विलास पाटील , ॲड . नानासाहेब पाटील प्रमुख उपस्थित होते. अतुल कुमार अंजान म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती




दिली आहे. या प्राणाची किंमत राज्यकर्त्यांमध्ये राहिलेली नाही. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सारख्या अनेकांनी योगदान दिले आहे. नऊ वर्षात महागाई गगनाला भिडली आहे. याची कुणाला ना खेद ना खंत आहे. शिक्षणाचे खाजगीकरण सुरू आहे. त्याकडे लक्ष दिले जात नाही. पंडीत नेहरूंची जाणीवपूर्वक बदनामी केली जात आहे. त्यांनी देशात प्रगतीपथावर आणला आहे. अनेक शैक्षणिक संस्था निर्माण केल्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. एकीकडे महिला सबलीकरणाच्या गोष्टी करायच्या तर दुसरीकडे मणीपुरसह देशातील महिला अत्याचार कोणीच बोलत नाही याची चर्चा गप्पा मारून लोकांना जाती धर्माच्या नावावर भुलवले जात आहे सत्ताधारी किंवा सत्तेची मलई हडप करण्यात गुंतले आहेत लोकशाही संपवण्याचे कारस्थानी रचली जात आहे हा डाव वेळीच ओळखणे गरजेचे आहे 2024 पर्यंत आपण शहाणे झालो नाही तर येणाऱ्या लोकसभेची निवडणूक ही या देशाची शेवटची निवडणूक ठरणार आहे याकरता सर्व कार्यकर्ते साहित्यिक, कलाकार, कलावंत पत्रकार ,नागरिक यांनी एकत्र येवून या विरुध्द लढण्यासाठी आवाज उठवण्याची गरज आहे तरच देश वाचू शकेल कानगो म्हणाले, देशाची इंग्रजांनी जेवढी लूट केली नाही. त्यापेक्षा अधिक लूट गेल्या नऊ वर्षांत झाली आहे. केंद्रातील सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करीत नाही. तर उद्योजकांच्या हितासाठी आहे. देश उद्योगपतींच्या हातात गेला पंतप्रधान हे लोकशाही रक्षक नाहीत. तर भक्षक आहे. राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराचा योग्य योग्य वापर करण्याची गरज आहे

मुंबई विद्यापीठात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जीवनावर आधारित पीएचडी पुर्ण केल्याबद्दल प्रा.शरद पाटील ( नेर्ली ) यांचा अतुलकुमार अंजान यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान, पत्रकार दमयंती पाटील यांनी क्रांतिवीरांगणा श्रीमती हौसाताई पाटील यांच्या जीवनावर लिहिलेल्या ' मी क्रांती मी संघर्ष ' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रारंभी ॲड. सुभाष पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे , विद्रोही सांस्कृतिक चळवळ धनाजी गुरव , डॉ. बाबूराव गुरव , ॲड. बन्सी सातपुते, पाणी चळवळीचे नेते भाई संपतराव पवार, रयत चे माधवराव मोहिते, प्रा.गौतमपुत्र कांबळे, बी.बी. लगारे , दादासाहेब ढेरे, जयराम मोरे गजानन सुतार, रघुराज मेटकरी, देवकुमार दुपटे, विश्वनाथ गायकवाड, मारुती शिरतोडे,हारुण मुल्ला संदीप ठोंबरे यांच्यासह परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते. ॲड. नानासाहेब पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले.



# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना दिला मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आत्महत्या करतो, हे अत्यंत खेदाची बाब आहे. कुटुंबातील कर्ता पुरुषच गेल्यानंतर त्यांच्या वारसांचे वाताहात रोखण्यासाठी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना त्यांची गरज ओळखून शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वांनी सामाजिक दायित्व समजून पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केले. त्या वरोरा येथे लोकाभिमुख कामांचा करूया निपटारा चला करू महसूल सप्ताह साजरा या कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी अमोल जांभुळकर, धनराज कुत्तरमारे, मंगेश घोडमारे, तानबा कुंभारे, शंकर देठे, नत्थू उईके, शरद चौधरी, बंडू कळस्कर, आशिष डेहने या वरोरा तालुक्यातील नऊ शेतकरी आत्महत्या प्रकरण आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या प्रयत्नाने मंजूर झाले. आज त्यांच्या कुटुंबियांना अनुदान वितरित करण्याबाबत. याप्रसंगी शिवनंदा लंगडापुरे उपविभागीय अधिकारी वरोरा, कौटकर तहसीलदार वरोरा, लोखंडे नायब तहसीलदार वरोरा, राजेंद्र चिकटे माजी सभापती कृ. उ. बाजार समिती वरोरा, सर्व कर्मचारी तहसील कार्यालय वरोरा, बाधित शेतकरी,काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# आपला दवाखानामध्ये घाणीचे साम्राज्य; जिल्ह्यात उडाला फज्जा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गहलोत**

**चंद्रपूर :** बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने सुरू



असलेल्या आपला दवाखाना मध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य असून शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेचा जिल्हयात फज्जा उडाल्याचे चित्र दिसून आहे.तर अनेक पदे सुद्धा रिक्त असून रिक्त पदे भरा व स्वच्छता ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करा अशी मागणी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी केली आहे.

राज्याव्दारे दवाखाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाने स्मार्ट बनवण्यासाठी सातत्यपूर्ण आरोग्य गुणवत्तापुर्ण सेवा प्रदान करण्यासाठी विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरिक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी तसेच सुलभ आणि परवडणारी दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करुन आरोग्य निर्देशांक वाढविण्याकरीता १५वा वित्त आयोग अंतर्गत राज्य शासनाने "हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" राज्यात ३४२ ठिकाणी स्थापन केलेले आहेत.

चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण ४४ ठिकाणी आपला दवाखाना सुरु करण्यात आलेले आहेत. या सर्व आपला दवाखान्याचे डिजिटल अनावरण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिन्दे यांचे हस्ते १ मे २०२३ रोजी महाराष्ट्र दिनी करण्यात आले. या योजनेमध्ये ग्रामीण व शहरी भागांतील जनतेला प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करुने देण्याचे शासनाचे उद्देश आहे. यामध्ये बाहयरुग्ण सेवा ( वेळ दुपारी २.०० ते रात्रो १०.०० ), मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा तपासणी, टेलीकन्सल्टेशन, गर्भवती मातांची तपासणी, लसीकरण या आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्याच्या सुचना आहेत. आपला दवाखाना मध्ये आरोग्य अधिकारी (एमबीबीएस), अधिपरिचारीका व आरोग्य सेवक (पुरुष) या प्रमाणे कंत्राटी पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच दवाखान्याच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षारक्षक व स्वच्छतेकरीता सफाई कामगार ही पदे मंजुर करुन बाहययंत्रणेमार्फत भरण्याची परवानगी दिलेली आहे. जिल्हयातील एकुण ४४ आपला दवाखना पैकी आजघडीला बरेच दवाखाने बंद स्थितीमध्ये असुन यामध्ये वैद्यकिय अधिकारी / अधिपरिचारीका / आरोग्य सेवक यांची पदे भरण्यात आलेली नाहीत. तसेच बाहय यंत्रणेव्दारे भरावयाची सुरक्षारक्षक व सफाई कामगार हि पदे जिल्हा प्रशासनाने अद्यापपर्यंत भरलेली नाहीत. तसेच या सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये आवश्यक औषध साहित्य सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. यामुळे शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेचा जिल्हयात पुर्णपणे फज्जा उडालेला असुन सुरक्षा रक्षक व सफाई कामगार नसल्याने संपूर्ण दवाखान्यामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. ग्रामीण व शहरी भागातील गरीब जनेतेच्या आरोग्याशी प्रशासनाने खेळ न करता जनतेला गुणवत्ता पुर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी केली आहे.

# घरात घुसून गुंडाने केला बलात्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातील खडकी परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर घरात घुसून गुंडाने बलात्कार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. धर्मेश कांबळे, वय २० असे आरोपीचे नाव असून त्याला अटक करण्यात आली आहे.


पीडित अल्पवयीन मुलगी आणि आरोपी धर्मेश कांबळे हे दोघे एकच परिसरात राहण्यास आहे. १८ मार्च रोजी पीडित मुलगी घरात झोपली होती. त्यावेळी आरोपी धर्मेश कांबळे याने घरात घुसून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या घटनेबाबत घरातील कोणाला सांगितल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तेव्हापासून आरोपी हा अल्पवयीन मुलीला सतत त्रास देत होता. या त्रासाला कंटाळून पीडित मुलीने तक्रार देताच आरोपी धर्मेश कांबळे याला अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू असल्याचे खडकी पोलिसांनी सांगितले.





महाराष्ट्र Business Katta









# अवेळीच केव्हा दाटला अंधार



सीमा गाडेकर
संपर्क क्र. 9423172305

आधुनिक केसरी

**ना. धो. महानोर यांचं दुःखद निधन झाल्याची बातमी कानावर पडली आणि एक निसर्ग कवी एक रानकवी ज्या कवीने आपल्या काव्यातून पावसावर सर्वात जास्त लिखाण केलं.... त्या महान कवीचा नेमका पावसाळ्यातच अंत व्हावा किती हा योगायोग मला तर आज असं वाटत आहे की जणू आपल्यावर लिहिलेलं एवढं अप्रतिम आणि एका पेक्षा वर्णन ऐकून पाऊसही या रान कवीच्या प्रेमात पडला असावा... .म्हणूनच तो आपल्या सर्वांच्या प्रिय व्यक्तीला कायमचंच आपल्या सर्वांपासून खूप दूर आपल्या सोबत घेऊन जायला धरतीवर अवतरला असावा..... आपल्या लिखाणातून निसर्ग व मानवी प्रेमभाव यांची सांगड घालणारा एक अत्यंत प्रतिभावंत कवी ज्यांचे एखादं गाणं सहज सकाळी सकाळी जरी कानावर पडलं तरी ते गाणं आपलं मन जणू दिवसभर मनाच्या गाभाऱ्यात गुणगुणत आहे असं वाटत राहतं..**

त्यातली काही गाणी जी मला खूप खूप आवडतात आणि ज्या गाण्याचे शब्द माझ्या ओठावर नेहमी रेंगाळतात त्या गाण्यातील शब्दाच सौंदर्य माझ्या मनाला सदैव भुरळ घालत राहत... त्यांच्या निसर्गावरील प्रत्येक गाण्यांमध्ये निसर्गातील विविध घटक जसे की पाऊस, झाडे, डोंगर, दऱ्या, आभाळ, पिके ,माती सतत आपली सोबत करत आहेतआपणही निसर्गाच्या सानिध्यात आहोत असाच जणू भास होतो....

त्यांच्या गाण्यात येणारा प्रत्येक पाऊस हा जणू प्रत्येक वेळी आपल्या शब्दसौंदर्याने पावसाचं वेगळेपणभासवतो. जेंव्हा तो दाटून आलेला असतो. तेव्हा कवी म्हणतात..

**नभ उतरू आलं**
**चिंब थरथर वलं**
**अंग झिम्माड झालं**
**हिरव्या बहरात..**

अशा गच्च भरलेल्या नभाचे वर्णन करताना महानोर प्रेमासाठी आसुलेल्या नायिकेला रितभात विसरायला लावतात.
तर निसर्गाचे मोहक रूप टिपताना ते म्हणतात...

**घन ओथंबून येती**
**बनात राघू ओघिरती**
**पंखा वरती सर ओघळती**
**झाडांतून झडझडती**

जेव्हा हे धन ओथंबून येतात तेव्हा चराचरात होणारा बदल कवी आपल्या शब्दातून सांगतात. पाऊस पडला की नदी, नाले सागर या सर्वांना भरते येते. सृष्टीतला हा बदल मोहून टाकतो. आणि धरतीचा साजन म्हणजे घन छेलछबिला होतो. या पावसात भिजणारी सजनी मात्र म्हणते..

चिंब पावसानं रानं झालं आबादानी
झाकू कशी पाठीवरली चांदण गोंदणी.

या प्रणय गीतातील नायिका पावसाला जसे उधाण येते तसेच प्रेमाला उधाण येऊन त्यात न्हाऊन निघत आहे. ना धो महानोर यांची पाऊस गाणी निसर्गाच्या वर्णना बरोबरच प्रेमाला बहर आणणारी आहेत.

या निसर्ग कवीने नुसत्या निसर्गावरच लिखाण नाही केलं तर निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी लोक व ठाकर जमाती यांच्यावरही सुंदर लिखाण केला आहे ते म्हणतात

आम्ही ठाकरं ठाकरं या रानाची पाखरं
या झांबर या गर्दीत मांडून इवले घर

हल्लीच्या आधुनिकीकरणआणि जागतिकीकरणाच्या पसाऱ्यात स्वतःचं अस्तित्व सांगणारी ही ठाकर जमात. त्यांचं अस्तित्व दाखवण्याचा आणि तो समाजापुढे मांडण्याचा अतिशय सुंदर प्रयत्न महानोरांनी केला आहे. आदिवासी जमातीला निसर्गापासून कधीच



वेगळं केलं जाऊ शकत नाही... डोंगर दर्या कड्या कपारामध्ये निसर्गाच्या सानिध्यात त्यांच्या संसाराचं वर्णन करताना आपल्या शब्दातून आदिवासींचं एक वेगळं रूप त्यांनी समाजासमोर आणलं....त्यातून निसर्ग त्यांना वेगळे करता येत नाही . या आदिवासींना भावना अतिशय शुद्ध असतात. असेच एक प्रेम भाव दाखवणारे त्यांचे गाणे म्हणजे

**जांभुळ पिकल्या झाडाखाली**
**ढोल कुणाचा वाज जी**
**वेंधळ वेड पाय कुणाचं**
**झिम्मा फुगडी घालं जी**

जांभळाचे प्रतीक वापरून तारुण्याला येणारा बहर कवींनी अत्यंत अल्लड पणे शब्दबद्ध केला आहे..... पण कुठेच भावनेची मर्यादा ओलांडताना प्रियकर आणि प्रेयसी दिसत नाहीत. हे खरे शब्दसामर्थ्य आहे.अशीच एक तरल प्रेम भाव त्यांच्या पुढील गाण्यात व्यक्त होते.

**किती जिवाला राखायच राखल**
**राया तुम्ही जाळ्यात पाखरु टाकल.**

असे म्हणणारी कवींची नायिका लाख डोळ्यात उतरते. सभेमध्ये म्हणजे लोकांमध्ये यां नात्याचे वादळ उठले तरी तिच्या प्रेमाची कबुली देते. मग ती थोडी बंडखोर सुद्धा होते आणि म्हणते.....

बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भिती गं
बाई जडली आता दोन जिवाची प्रीती गं

रानात सांडलेल्या निळा आभाळाच्या जोरावर तिचे प्रेम फुलत जाते.ती बंडखोर होते. घरकुलाचे स्वप्न पांघरणारी नायीका ना.धो महानोर आपल्या शब्दातून रेखाटतात. तशी ती कधीतरी उदास उदास होते हे सुद्धा ते जाणतात.

**आज उदास उदास दूर पांगल्या सावल्या**
**एकांताच्या पारावर हिरमुसल्या डहाळ्या**

दूर गेलेल्या व्यक्तीच्या विरहाने व्याकूळ झालेली ती बोलघेवडी साळुंकी एक चकार शब्द बोलत नाही. पण ना.धो महानोर यांचे हे शब्द मात्र मनाचा ठाव घेतात. या आणि अशा अनेक गाण्यांना बरोबरच ना.धो महानोरांनी निसर्ग आणि प्रेम यांचा मिलाप आपल्या शब्दाशब्दातून जागवला आहे. चांद केवड्याची रात, अवेळीच केव्हा दाटला अंधार, गोऱ्या देहावरती कांती, दुरच्या रानात केळीच्या बनात, अशी कितीतरी सुरेख मराठी गाणी महानोरांच्या लेखणीतून अजरामर झाली.....

कवी,गीतकार,मा.आमदार,,बालकवी, आणि बहिणाबाईंचा वारसा समृध्द चक्रस्तव करणारा अशी ओळख असणारा अष्टपैलू व्यक्तिमत्व लाभलेला साहित्यिक. यांच्या निधनाने रसिक मनाला रानाशी मैत्री घडवून देणारा कवी हरपला आहे. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याला एका वेगळ्या उंचीवर नेणारा महान साहित्यिक आपण गमावला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते.

त्यांनी चित्रपटासाठी लिहिलेली गीते मनाचा ठाव घेणारी आहेत. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक थोर साहित्यिक गमावला आहे.अशा या महान*
*साहित्यिक,कवीस महाराष्ट्र मुकला आहे. स्वर्गिय ना.धों.महानोर यांना ईश्वरचरणी स्थान मिळो हिच प्रार्थना..

# गाव-खेड्याचे साजिवंत चित्रण : 'बारा गावचं संचित'

आधुनिक केसरी

**...सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील प्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे यांचा ' बारा गावचं संचित ' हा पहिलाच कथासंग्रह शब्द शिवार प्रकाशन,मंगळवेढा जि.सोलापूर यांनी देखण्या स्वरूपात नुकताच प्रकाशित केला असून या संग्रहात आजच्या समकालीन ग्रामीण वास्तवाच्या विविध पैलूंचे जिवंत चित्रण करणाऱ्या एकूण बारा कथा आहेत. निर्दयी नि मस्तवाल बागायतदार मालकाकडून निरक्षर असलेल्या भीमा नांवाच्या सालगड्याच्या होणाऱ्या शोषणावर झोत टाकणारी ' निष्ठा ' कथा असून यातील भीमाची स्थिती-गती वाचून मनात जमीन मालकाविषयी चीड उत्पन्न होते.**

तर 'आरक्षण ' ही कथा गावातील मस्तीखोर नि मुरब्बी धनदांडग्यांकडून



खेळले जाणारे हीन पातळीवरचे राजकारण बिरुसारख्या एखाद्या गरीब नि पापभिरु माणसाच्या उभ्या आयुष्याची कशी धुळधाण करते, याचे वेधक नि भेदक चित्रण करून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानंतरही आजच्या ग्रामीण राजकारणाचे भयावह वास्तव उजागर करते. नवरा आजारी असल्यामुळे चार पैसे मिळवण्यासाठी उधार वांगे घेऊन बाजारात विक्रीला बसलेल्या अलकाचा तो वांगे विक्रीचा आतबट्ट्याचा व्यवहार अंगलट येतो तेंव्हा तिच्या अब्रूवरच कशी टाच येते,याचे अंतःकरण हेलावून टाकणारे चित्रण ' बाजार ' कथेत रेखाटले असून अलका जेव्हा तिच्यावर आलेल्या धर्म संकटातून स्वतःच्या अंगभूत हुशारीने सूटका करून घेते, तेव्हा वाचक मनाला दिलासा लाभल्याशिवाय राहत नाही. अशी ही भावस्पर्शी कथा आहे,तर ग्रामीण संस्कृतीला नांवे ठेवणाऱ्या सुशिक्षित माधवीला खेड्यातील वसंतासोबत लग्न झाल्यानंतर घरच्या खेडवळ वातावरणामुळे तेथे ती दोन दिवसही राहू वाटत नाही आणि ती शहरात परत जाते;पण जेव्हा कोरोनाचा फैलाव होतो तेव्हा मात्र तिला गावाकडे येण्याशिवाय पर्याय राहत नाही. मग ती गावी आल्यावर तिला तेथील अडाणी नि मायाळू माणसांच्या अंतःकरणातील मायेचे आणि माणूसकीचे दर्शन तिला घडते आणि मग तिचे डोळे उघडतात, असा कांहिसा आशय असलेली ' माधवीः एक सत्यकथा ' ही कथा असून तीमधून गाव-खेड्यातील माणसांच्या मायेचा गोडवा चित्रित झाला असून ही कथा खेड्याविषयी अनेक जणांच्या मनात असलेल्या अनेक गैरसमजूतींना नेमकेपणाने छेद देते. खेड्यात राहणारा महेश दहावी पास होऊन शहरातल्या कॉलेजात आल्यावर शहरी संस्कृतीचे वळण असलेल्या सुलभाच्या प्रेमात पडतो आणि तिच्या पुरता आहारी जाऊन तो स्वतःचे घर-दार,आई-वडील आणि गाव-शीव या साऱ्यांना कसे विसरुन जातो,याचे सार्थ चित्रण ' तरुणाई ' कथेत आले असून ही कथा आजच्या तरुण पिढीच्या चंगळवादी मानसिकतेवर उजेड टाकते, तर ' गावगाडा ' या कथेतून खेड्यातील सरंजामी मानसिकता असलेल्या गटा-तटाच्या राजकारणाने खेड्यातले भावजीवन निर्दयतेने कसे कलुषित केलेले आहे,त्याचा प्रत्यय येतो.ज्ञानदा या हिमंतवान स्त्रीने स्वतःच्या इज्जतीवर आलेले अरिष्ट कसे धुडकावून लावले,याची अंतर्मुख करणारी गोष्ट म्हणजे ' विहीर ही कथा असून या कथेतून लेखकाने गाव-खेड्यातील रंगेल वृत्ती- प्रवृत्तीवर प्रकाशझोत टाकला आहे,तर एका गावात स्नेह संमेलनाचा प्रमुख अतिथी म्हणून स्वतः लेखक गेला असताना तेथे त्याला आलेल्या विपरित नि हास्यास्पद अनुभवांचे जिवंत चित्रण करणारी ' लेखक ' ही कथा ग्रामीण परिसरातील एका लेखकाच्या हलाखीच्या जगण्याचा वेध घेते.या नर्म विनोदी शैलीतल्या मनोरंजक कथेला लेखकाच्या हलाखीच्या जगण्याची कारुण्यपूर्ण झालर असल्यामुळे ही कथा अंतर्मुख करते.तसेच संग्रहातील ' स्वप्न ' , ' जाणती ' आणि ' मंजुळा ' या कथाही ग्रामीण परिसरातील स्त्रियांचे भावविश्व अधोरेखित करणाऱ्या आहेत.

.. एकूणात लेखक जयवंत आवटे लिखित ' बारा गावचं संचित ' मधील कथा गाव-खेड्याचे वर्तमानकालीन वास्तव ओघवत्या भाषेत आणि चित्रदर्शी शैलीत चित्रित करणारी असून बोली भाषेतील नेटके संवाद आणि शेणा-मातीचा रानगंध असलेल्या पात्रांमुळे ही कथा जिवंत नि साजिवंत झाली आहे आणि त्यामुळे ही कथा वाचक मनाची पकड घेईल,यात संदेह नाही.तरीही एक नोंदवावेसे वाटते की, ' मंजुळा ' व ' गावधोंड ' या दोन कथा मात्र निव्वळ किस्सेवजा झालेल्या आहेत. असे असले तरीही जयवंत आवटे यांचा हा पहिला कथा संग्रह त्यांच्या विषयी आगामी काळात अनेक अपेक्षा निर्माण करणारा आहे,हे नक्की ! त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा ! !

**( कथासंग्रह ) - बारा गावचं संचित**
**लेखक - जयवंत आवटे**
**प्रकाशक - शब्द शिवार प्रकाशन, मंगळवेढा जि.सोलापूर**
**पृष्ठे - १७२**
**मूल्य - २००**
**मुखपृष्ठ - गणेश पुंडेकर**




**( परीक्षण : उमेश मोहिते, मो.७६६६१८६९२८ )**

# पुढाऱ्यांनो सत्यासाठी लढा

आधुनिक केसरी

**भारताच्या इतिहासाचा विचार जर केला तर एकेकाळी सोन्याचा धूर निघणाऱ्या या राजा-महाराजांच्या संत महात्म्यांच्या या भारत देशात आज चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक प्रश्न आणि अनेक संकट वेगळ्या प्रकारचे द्दष्य या भारत देशात घडत आहे. समोर येत आहे. ज्या देशाला जगातील देशासाठी गुरुस्थान आहे. अनेक देशातील लोकांनी या भारत देशातील झालेल्या महामानवाचे आदर्श घेवुन आपल देश आदर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.**

त्याच भारत देशाची अशी दशा डोळ्यांनी पाहिली जात नाही ज्या देशात सुख समाधान ईश्वर संपत्तीचा पूर येत होता आणि आनंदाच्या रूपाने सोन्याचा धूर निघत होता त्याच देशात आज सुख शांती तर दिसतच नाही. दुःख दारिद्र्य पूर आल्यासारख वाटत आहे.याचा विचार केला तर याला दोषी कोण तर या देशामध्ये जन्माला आलेल्या आणि या देशासाठी आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या संतांनी महापुरुषांनी कधी असा विचार केला नसेल की या देशात धर्मवार वाद होतील जातीवर वाद होतील पक्षावर वाद होतील देवांच्या नावावर वाद होतील दंगली पेटतील आणी हे पेटवून देणारे कोण असतील तर आपलेच नाव घेवून जगणारे आपलेच अनुयायी असतील.आज या देशाची अवस्था गभीर झाली आहे.देशात बेरोजगारीचे संकट थैमान घालत असताना महागाई सामान्य माणसाच्या नरड्याचा घोट घेत असताना.



आमच्या देशाचे पुढारी नेते समाजसुधारक या गंभीर प्रश्नाकडे लक्ष न देता. या देशाच्या तरुणांच्या हाती नवा रोजगार न देता या तरुणाला जातीवादाच्या धर्मपंथ पक्षाच्या वादाच्या आगीत ढकलत आहे. देशाच्या आजच्या परिस्थितीचा विचार केला तर ती अशी आहे .
देशात कामाचा उभा डोंगर। दारिद्र्य दुःखाचा वाहतो पुर।अर्धनग्न अर्धपोटी लोक अपार। परी त्यांचे दुःख का न दिसे।। ऐकीकडे देशात एवढ्या कामाचा डोंगर पडला आहे सामान्य माणसाचा महागाई जीव घेत आहे त्यांच्या कडे लक्ष न देता आमच्या इथले जबाबदार पुढारी आमच्या तरुणाच्या हाताला काम न देता. त्यांना गुन्हेगारी कडे वढवतात त्यांच्या हाताला बेड्या देतात विकृत भावना त्यांच्या मध्ये पेरतात परधर्माची विटंबना करण्याचे शिकवता. इथल्या जाणत्या पुढार्यांनी ही बाब बंद करायला पाहिजे.देशाच्या भविष्याचा विचार करून आपला देश कसा पुन्हा सुजलाम सुफलाम बनेल याचा विचार करायला पाहिजे.पण आमचे नेते आज एकमेकांची जिरवण्यात गुंतले आहे.कोणीकोणाच्या विरोधात चौकशी लावतो.कोणी कोणाच्या विरोधात संप करतो कोणी कोणाच्या विरोधात बंड करतो. कोणी कोणाच्या घरावर मोर्चे काढतो.पण यात तुमचं भल आहे सामान्य जनतेच नाही.सामान्य जनतेच्या कामाच काय. ज्यांनी तुमच्यावर विकासाचा विश्वास ठेवून जबादारी देली त्याच काय.तुम्ही आज स्वतःला वाचवण्यात आणि दुसऱ्याला बदनाम करण्यात यशस्वी होत आहा.पण सामान्य जनतेच्या कार्यासाठी तुम्ही अपयशी होत आहात ना.त्याच्या कडे सुद्धा लक्ष असू द्या.

आज आमच्या पुढार्यांनी सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नाना प्राधान्य द्यावं.कोरोनासारख्या महामारीमुळे सामान्य माणूस हतबल झाला आहे. त्याला त्यामधून सावरण्यासाठी तुमच्या सहकार्याची गरज आहे. आज राज्यात देशात अनेक कामे रखडले आहे. त्याकडे आमच्या पुढाऱ्यांनी लक्ष द्यावे. महागाई बेरोजगारी भ्रष्टाचार यापासून सामान्य समाज वाचेल याचा प्रयत्न करावा. सामान्य समाजाची दिशाभूल न करता धर्मपंथाच्या पक्ष्यांच्या वादात जातिय वादात न अडकवता त्याला नवी दिशा द्यावी. महापुरुषांच्या स्वप्नातला देश घडवावा. हे आपले प्रथम कर्तव्य म्हणून सर्व पक्षाच्या पुढाऱ्यांनी कार्य करावे. नुसते वादच न करता आपल्या गावाचा आपल्या समाजाचा विकास होईल याचा प्रयत्न करावा. सामान्य माणसाचं मत जाणून घ्यावं. सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी पुढारी व्हावं.सत्यासाठी लढावं हीच एक सामान्य माणूस म्हणून विनंती करतो. शोषण नाही सेवा करा.जनतेचे मालक नाही सेवक बना.
कारण सत्ता की आयु न बढि।सेवा की ध्वज सदा घडी।।

**महेंद्रा सावके (हिरंगी), मो.न-९६०४६८०६८३**

# ऑगस्ट क्रांती दिवस विशेष



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आजच्या दिवशी- दि.८ ऑगस्ट १९४२रोजी रात्रीपासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची मनसुबे तयार झालीत. महात्मा गांधीजींनी छोडो भारत व करेंगे या मरेंगेचा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि नेत्यांनी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे हा क्रांतीदिन म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणूनही स्मरण केला जातो. म.गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर क्रांती दिन साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांनी पुकारलेला सन १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता. आज आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सर्व नाम-अनाम क्रांतीकारकांना विनम्र अभिवादन करुयात!**

देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी पुढे आंदोलनांना सुरवात झाली. ब्रिटिश सत्ता पार हादरून गेली होती. हे रोखायचे कसे ? असा प्रश्न त्यांना पडला होता. अशात हे आंदोलन देशभर पसरणार म्हणून ९ ऑगस्टच्या पहाटेच म.गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनके काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. भारतीय जनमानसात असंतोषाचा विस्फोट झाला, त्यामुळे ब्रिटिश शासन भयभीत झाले. एकाच वेळी देशभर कारवाया सुरू झाल्या व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना अटक सत्र सुरू केले अनेक नेते भूमिगत झाले. देशभर पोलीस ठाण्यावर व मामलेदार कचेरीवर, सरकारी कार्यालयांवर मोर्चे निघू लागले. युवक हातात तिरंगा झेंडा घेऊन घोषणा देत लाठीचार्ज व गोळीबार झेलत धैर्याने तिरंगा फडकवू लागले. समाजवाद्यांनी भूमिगत कारवायांवर लक्ष केले. रेल्वे स्थानके मोडतोड, रूळ उखडणे, पोस्ट कार्यालय जाळणे, वीज तोडणे, गनिमी पद्धतीने ही कामे सुरू झाली. पोलिसांकडून अटक सत्र सुरू झाले. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, सामान्य नागरिक, स्त्री-पुरुष सर्व या आंदोलनात सहभागी झाले. देशभरातील युवकांनी यात भाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी, यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो.

देशभर स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. चले जावमुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना केली. हे आंदोलन उभे राहण्याआधीच ब्रिटिश सरकारने मोडून काढण्याचे ठरवले होते. त्या पद्धतीने देशभर कारवाया केल्या व आंदोलन मोडून काढले. परंतु या आंदोलनाने जगाला वेगळी ओळख दिली. कारण कोणताच सेनापती नसताना स्वातंत्र्याचे युद्ध जनतेने हातात घेतले होते. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ लागला, हे विशेष. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दि.९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाने भारतातील इंग्रज सरकारला चले जावचा इशारा दिला. या दिवसापासून स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भारतीयांनी करेंगे या मरेंगे अशी निर्वाणीची भूमिका घेतली. इंग्रजांना छोडो भारत हा अखेरचा इशारा दिला होता. या आंदोलनाला गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात सुरूवात केली होते. यामुळे जणू एक क्रांतीची जोतच पेटली होती. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देणाऱ्या सर्व थोर पुरूषांना विनंम्र अभिवादन!

देशभरात ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वतंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे म.गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला भारत छोडो, असे नाव देण्यात आले होते. करो या मरो, अशी या आंदोलनाची घोषणा होती. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि थोर नेत्यानी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस क्रांतिदिन म्हणून ओळखला




जाऊ लागला. मात्र, इतकी कठोर भूमिका घेतल्या नंतर पाच वर्षानी आपल्याला स्वातंत्र्य लाभले. दि. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा कालावधी प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवायला हवा, इतका तो ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. दरम्यान, गांधींच्या नेतृत्वात इंग्रज सरकारविरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर देशभर अहिंसक जनआंदोलन लवकरच उभे राहील, अशा शब्दांत महासमितीने आपला निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळेच गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, अशा ज्येष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच इंग्रज सरकारने अटक करून अज्ञातस्थळी रवाना केले होते. सरकारने त्यांना कुठे ठेवले ह्याची गुप्तता पाळली होती. मात्र, तरी बातमी फुटलीच. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये आणि नेहरू, पटेल, आझाद या मंडळींना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आल्याचे समजले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आले. सरकारने लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली. पण लोक आता आदेश मानायला तयार नव्हते. पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले. यासर्व प्रकाराला सरकारने गांधीजींना जबाबदार ठरवले. त्याचा निषेधार्थ गांधीजीने २१ दिवसांचे अंदोलनही केले होते. प्रतिसरकारमुळे मूळ सरकार खवळेले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. त्यात हजारांहून अधिक मृत्यू, तितकेच जखमी, महिलांची विटंबना तर लाखोंना अटक केली होती, अशा नोंदी आहेत. ही चळवळ युद्धासारखी होती. या लढाईत योगदान देणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रांतिलढ्यांना वंदन!

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर इंग्रजांनी गांधीजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी तरुण कार्यकर्त्या अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टँक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला. मात्र, गांधीजींनी हेही आंदोलन अहिंसक मार्गानेच करावे, असे आवाहन देशवासियांना केले होते. तरीही देशातील अनेक भागात हिंसा आणि तोडफोड करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार अगोदरच खिळखिळे बनले होते. तर या आंदोलनामुळे ब्रिटीशांची उरली-सुरली ताकदही लोप पावत गेली. त्यानंतर देशवासियांनी इंग्रजांना हाकलून लावेपर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवले. भारताला दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या आंदोलनात आपले बलिदान देणाऱ्या नागरिकांना श्रद्धांजली म्हणून हा ऑगस्ट क्रांती दिन साजरा केला जातो.

# हिरोशिमाच्या इतिहासातील काळा दिवस



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**तो काळा दिवस होता-6 ऑगस्ट 1945. भयंकर अणुबॉम्बच्या स्फोटाने चार लाख लोकांचा घास घेतला. किरणोत्सर्जनाचे परिणाम पुढे अनेक वर्षे अनंत लोकांनी सोसले. या कटू घटनेला 78 वर्षे पूर्ण होत आहेत. 1945 साली सर्वत्र महायुद्धाचे ढग दाटून आले होते. सगळे जग युद्धाच्या छायेने ग्रासले होते. परंतु लाखो लोकांचे प्राण घेणाऱ्या अणुबॉम्बच्या विध्वंसक शक्तीची कुणालाच कल्पना नव्हती. मात्र आज त्या घटनेच्या नुसत्या  आठवणीने आपल्या हृदयात कालवाकालव होते. 6 ऑगस्ट 1945 रोजी हिरोशिमातले सामान्य जनजीवन सकाळी नित्याप्रमाणे सुरू झाले. सकाळचे सव्वा आठ वाजलेले. शाळा-महाविद्यालये, नोकरी-चाकरीसाठी जाणाऱ्यांची लगबग. रस्त्यावरून एका छोट्या मुलीला घेऊन तिची आई चालली होती.**

"आई आई, लवकर बघ, वर आकाशात किती तेजस्वी काहीतरी..." आणि तिचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच सूर्याइतकीच प्रखर उष्णता बाहेर फेकत, सारे आसमंत हादरावणारा महाभयंकर आवाज करत आगीचा लोळ जमिनीवर आदळला होता. त्या मुलीचा आणि तिच्या आईचाच नव्हे तर हिरोशिमातील चार लाख लोकांचा घास त्या भयंकर अणुबॉम्बने घेतला. माणसांचे कोळसे झाले. चालत्या-बोलत्या माणसांचे देह हवेत उंच उडून त्यांचे अवयव जमिनीवर इतस्ततः उधळले. प्रेतांचा खच, रक्ताचे पाट आणि हाडामांसाच्या चिखलाने हिरोशिमाची भूमी संपूर्णपणे व्यापली. रेल्वे, बसेस, ट्रॅम्स आणि इमारती कोसळल्या. आगीचा डोंब उसळला. धुराचे लोट इतके की नजरेसमोर काहीच न दिसावे. पण नजरेसमोर पाहण्यासाठी जिवंत तर कुणी हवे ? डोळ्यांची पापणीही लवायला अधिक वेळ लागेल इतक्या क्षणात गगनभेदी किंकाळ्यांनी आसमंत भरून गेला. जणू ही पृथ्वीच नष्ट होतेय असं वाटावं. 43 लोकवस्तीचे आणि सात नद्यांचा परिसर असलेले हिरोशिमा क्षणात बेचिराख झाले. भाजलेली,पोळलेली, मरणप्राय वेदना सहन करीत पाण्याच्या शोधात जणू प्रेतेच सैरावैरा धावत होती. नव्हे धावयाचा प्रयत्न करता करताच एकेकजण कोसळून प्राण सोडत होता. मृत्यूला कवटाळत होता. एका शांततापूर्ण शहराचे जळणाऱ्या नरकात रुपांतर झाले होते.

हे महायुद्ध संपल्यावरही 25-30वर्षे किरणोत्सर्जनाचे परिणाम भोगत अनंत लोकांनी प्राण सोडले. हिरोशिमाच्या आसपासच्या आठ ते दहा मैलांच्या परिसरात अणुबॉम्बच्या भयावह परिणामांचे बळी जात राहिले. आजही स्फोटातून अत्यंत गंभीर रीतीने जखमी झालेले व मृतवत जीवन जगणारे काही हजार जीव तिथे आहेत. त्यांची वस्ती सामान्यांपासून, शहरापासून दूर आहे. त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून सरकार सर्वोतोपरी काळजी घेते. त्यांच्या औषधापाण्याची सोया सरकारच करते.

हिरोशिमातील महाभयंकर घटनेला एक वर्ष पूर्ण होताना हजारोंच्या संख्येने स्वयंस्फूर्तीने लोकांनी बळी गेलेल्या किंवा त्यांचे भयंकर परिणाम भोगत असलेल्या लोकांसाठी मदतकार्य सुरू केले. पुढे त्यांना बहुसंख्य लोक येऊन मिळाले. या सर्वांच्या प्रयत्नांने 'पीस पार्क' उभे राहिले. ऑगस्ट 1949 मध्ये जपान सरकारने हिरोशिमाला 'पीस मेमोरिअल सिटी' म्हणून घोषित केले.

या परिसरात एक स्मारक उभारले आहे. त्याच्यासमोरचा परिसर स्वच्छ,सुंदर,रमणीय आणि खूप मोठा आहे. इथे दरवर्षी6 ऑगस्टला लाखभर लोक येऊन मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना शोकाकुल होऊन श्रद्धांजली वाहतात.'No more Hiroshimas. Don't allow the disaster of Hiroshima to be repeated...' अशी प्रार्थना करतात.

इथेच एका दुमजली भव्य इमारतीमध्ये 'हिरोशिमा हिस्टरी म्युझियम' उभारले आहे. तिथे अणुबॉम्ब पूर्वीच्या आणि नंतरच्या हिरोशिमाची छायाचित्रे, वस्तू, पुतळे इ.मांडून त्याबद्दलची सविस्तर माहिती जपानी आणि इंग्रजी भाषेत दिली आहे. शिवाय या विषयावरचा अर्ध्या तासाचा लघुपट दाखवला जातो. म्युझियम आणि लघुपट पाहताना मानवी क्रौर्याची, अमानुषतेची दृश्ये पाहून मान शरमेने आणि दुःखाने खाली जाते.

1945 मध्ये त्या बॉम्बस्फोटातून दोन वर्षे वयाची सडाको ससाकी ही मुलगी वाचली होती. पुढे ती शाळेत जाऊ लागली. धावपटू म्हणून तिने नाव कमवायला सुरुवात केली. पण वयाच्या अकराव्या वर्षी तिला किरणोत्साराच्या परिणामाने झालेल्या कर्करोगाने गाठले. ती अत्यंत निराश आणि दुःखी झाली. तिचे वर्गमित्र तिला भेटायला येत.क्रेन पक्षी एक हजार वर्षे जगतो. 'तू जर एक हजार कागदी क्रेन बनवलेस तर तुझी इच्छा पूर्ण होऊन तू पुन्हा पूर्ववत निरोगी होशील', असे मैत्रिणीने सांगितल्यावर सडाको हॉस्पिटलमध्ये गंभीर अवस्थेतही रंगीत कागदाचे क्रेन बनवू लागली. मृत्यूपूर्वी तिने 644 क्रेन बनवले. पण अखेरीस मृत्यूने 1955 मध्ये तिला गाठलेच. पुढे तिच्या वर्गमित्रांनी उरलेले 356 क्रेन बनवले आणि सडाकोच्या पार्थिव देहाबरोबर ते सर्व एक हजार क्रेन दफन केले गेले. एका अर्थी तिची इच्छा पूर्ण झाली होती. अनेक वर्षे तिने तेथील लोकांच्या हृदयात स्थान मिळवले.




या दुर्घटनेत ज्या लहान मुलांचे सडाकोप्रमाणे बळी गेले त्यांचे स्मारक उभारण्याचे जपानमधील तरुणांनी ठरवले. त्यासाठी देशभरातून आर्थिक मदत गोळा करण्यात आली. आणि 1958 मध्ये 'हिरोशिमा पीस पार्क'जवळच त्या स्मारकाचे अनावरण झाले. 'माऊंटन ऑफ पराडाईज' नावाच्या ग्रॅनाईटच्या उंच वास्तूच्या शिखरावर आपल्या पसरलेल्या हातात क्रेन पक्षी घेतलेली सडाको त्या ठिकाणी आपल्याला दिसते. दरवर्षी6 ऑगस्टला म्हणजेच शांततादिनी हजारो कागदी क्रेन्स अर्पण केले जातात. या स्मारकावर शब्द कोरले आहेत.

**There is our cry This is our prayer Peace in the world.**

चार टन वजनाचा जगातला पहिला अणुबॉम्ब अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात जपानमधील हिरोशिमा या शहरावर टाकला. या बॉम्बचे नामकरण 'लिटल बॉय'असे करण्यात आले होते. कारण प्रत्यक्ष डिझाईनपेक्षा थोडा लहान होता. अमेरिकेने बी 29 जातीचे 'इनोला गे' नावाचे विमान बॉम्ब टाकण्यासाठी वापरले होते. पश्चिम पॅसिफिकमधील तिनियान या अमेरिकी तळावरून या विमानाने इतर दोन विमानांसह उड्डाण केले होते. जपानमधील इच्छित स्थळी पोहचण्यासाठी त्याला तब्बल सहा तास लागले. 'इनोला गे' ठरवलेल्या उंचीवर ( 10 हजार मीटर ) आणि ठरवलेल्या लक्ष्यावर येताच त्यातून 'लिटल बॉय' खाली सोडण्यात आला. स्फोटाच्या पूर्वनियोजित उंचीवर ( 600 मीटर ) पोहोचायला त्याला 57 सेकंद लागले. स्फोट होताच हिरोशिमाच्या इतिहासातील तो काळा दिवस उगवला.

अणुबॉम्बमधील युरेनियम व प्लुटोनियम यांच्या विघटन क्रियेतून बाहेर पडणारी ऊर्जा अत्यंत भयंकर व प्रचंड असते. आरडीएक्स किंवा टीएनटी पेक्षा हजारो पटींनी ही ऊर्जा जास्त असते. ऊर्जेबरोबर बाहेर पडणारे किरणोत्सारी किरणे हे जास्त संहारक व खूप वेळ टिकणारे असतात. 'लिटल बॉय' मध्ये 50 किलो युरेनियम-235 हे मूलद्रव्य भरलेले होते. साधारण एक किलो वजनाच्या युरेनियम-235 च्या विघटनाने निर्माण होणारी ऊर्जा ही 16 हजार टन टीएनटी ( ट्रायनायट्रो टोल्युईन ) विस्फोटकाच्या ऊर्जेएवढी असते. या ऊर्जेतील50 टक्के ऊर्जा स्फोट स्वरूपात ( pressure wave ), 35 टक्के उच्च तापमानाच्या स्वरूपात आणि 15 टक्के ऊर्जा किरणोत्साराच्या स्वरूपात बाहेर टाकली जाते. स्फोटाच्या केंद्रातील तापमान 10 लाख डिग्री सेल्सिअस इतके असते. स्फोटामुळे प्रचंड वेगाने पसरणारा एक आगीचा लोळ तयार होतो. केवळ एका सेकंदात पसरणारा हा लोळ 200 मीटर एवढी त्रिज्या व्यापतो. या क्षणी या लोळाच्या पृष्ठ भागावरील तापमान 5 हजार डिग्री सेल्सिअस इतकं पोहोचतं. अर्थात स्फोटातील 50 टक्के ऊर्जा 'प्रेशर वेव्ह' या स्वरूपात असल्याने 'प्रचंड विध्वंसक दाब' स्फोट केंद्रातून निर्माण होतो. व या विध्वंसक'दाबलहरी' आपल्या वाटेत येणारी प्रत्येक गोष्ट उद्वस्त करतात. तापमान,विध्वंसक दाब व किरणोत्सर्ग यांच्या मिश्र परिणामाने हिरोशिमाचा अक्षरशः कोळसा झाला. स्फोट केंद्रापासून दोन किलोमीटर त्रिज्येतील सर्व मालमत्ता व मानवी जीवन पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाले. दोन ते तीन किलोमीटर त्रिज्येतील जवळजवळ90 टक्के मालमत्ता नष्ट झाली किंवा त्यांचे प्रचंड नुकसान झाले. किरणोत्सर्गाचे प्रमाण सुरुवातीला प्रचंड होते. ऑगस्ट ते डिसेंबर1945 या कालावधीत अनेक लोक किरणोत्सर्गाने होणाऱ्या रोगाने दगावले. किरणोत्सर्गाची लागण पूर्णपणे नाहीशी व्हायला त्यापुढील चार दशके जावी लागली.

# आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते रस्तेकामाचे उद्घाटन

## शेकडो कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील मारतळा- नांदगाव येथील 40 लक्ष रुपये कामाच्या रस्त्याचे उद्घाटन व नांदगाव- चिंचोली येथील दहा लक्ष रुपये कामाचे उद्घाटन काल रविवार लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षा शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे, खरेदी-विक्री संघाचे सभापती स्वप्नील पाटील उमरेकर, माजी सरपंच गोविंदराव पाटील चिंचोलीकर, माजी सरपंच राजू पाटील कापसिकर, सचिन पाटील कुदळकर, नांदगावचे सरपंच संतोष भरकडे, डोणवाडाचे सरपंच भगवान घोडके, हातनीचे माजी सरपंच सुनील भदरगे, माजी सरपंच पपू भुरे, सरपंच नागोराव कापसे, उद्धव पाटील नांदगावकर, सरपंच शिवाजी आळने, साई पाटील हातनीकर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावरून बोलताना आमदार शिंदे म्हणाले की, मतदारसंघात सर्वात जास्त निधी उमरा सर्कलला उपलब्ध करून दिला असून मी या भागाचा आमदार म्हणून विकास कामात कधीही भेदभाव करणार नसून आम्ही जात-पात धर्मपंथ मानत नसून मानवता हीच एक जात मानत असल्याचे यावेळी आमदार शिंदे म्हणाले, मतदारसंघात सिंचनाचे क्षेत्र वाढवण्यासाठी व या भागातील शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी हिंदोळा येथे एक हजार कोटीची धरणे होणार आहेत या भागातील शेतकऱ्यांना दळणवळणासाठी व शेतकऱ्यांचा शेतीमाल मोठ मोठ्या शहरात वेळेत जाण्यासाठी ऐथून जाणारा समृद्धी महामार्ग हा प्रमुख मेट्रो सिटी ला जोडण्यासाठी मी प्रयत्नशील



असल्याचेही आमदार शिंदे म्हणाले, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना सह विविध शासकीय योजनांचा वंचित उपेक्षित नागरिकांना लाभ होण्यासाठी यापुढे गाव पातळीवर कॅम्प घेतले जाणार असल्याचे यावेळी आमदार शिंदे यांनी बोलताना सांगितले. नांदगाव- चिंचोली- मारतळा या रस्त्याच्या 50 लक्ष रुपये कामाचे उद्घाटन आमदार शिंदे यांच्या हस्ते पार पडल्याने अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न आमदार शिंदे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला असल्याने या भागातील नागरिकांकडून आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे अभिनंदन होत आहे, यावेळी शेकापच्या प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे यांनीही उपस्थिताना मार्गदर्शन केले.

यावेळी लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे व शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांच्या विकासाभिमुख व खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून नांदगावचे सरपंच संतोष भरकडे सह शेकडो तरुणांनी आमदार शिंदे यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला, यावेळी आमदार शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



# गोंडगाव घटनेतील नराधमाला फाशी द्या

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरातील युवकांनी आज हनुमान मंदिराजवळ मोठया संख्येने एकत्र जमून गोंडगाव ( ता.भडगांव जि. जळगांव ) येथील घटनेचा तीव्र निषेध करीत नराधम आरोपीला फासावर लटकविणयात यावे या मागणीचे निवेदन सोयगाव पोलीस ठाण्यात अजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी दिले.

गोंडगाव (ता.भडगांव जि. जळगाव) येथील एका नराधमाने एका नऊ वर्षांच्या बालिकेवर आत्याचार करून ठार मारून प्रेत लपवून ठेवत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा सोयगाव शहरातील हनुमान मंदिराजवळ एकत्र जमून युवकांनी तीव्र निषेध करीत नराधम आरोपींविरुद्ध खटला जलद गती न्यायालयात चालवून आरोपीला त्वरित फासावर चढवून दयावे. तसेच सरकारने कडक कायदा करावा या मागणीचे निवेदन सोयगाव पोलीस ठाण्यात जमादार रवींद्र म्हस्के यांना युवकांनी दिले. यावेळी अजय पाटील, रोहन चौधरी, राहुल पाटील, विशाल पवार, मयुर हिरे, तुषार जाधव, ऋषिकेश मानकर, राम एंडोले, जयेश सोनार, रोहन नवगिरे, भूषण पाटील, सागर गायकवाड, धीरज बागले, रितेश वाघ, निलेश नागपूरे, रितेश चौधरी, सचिन आगे, राहुल वाघ आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# मनपातर्फे सेल्फी स्पर्धा : माझी माती माझा देश व हर घर तिरंगा अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत घरो घरी तिरंगा व माझी माती माझा देश अभियान राबविले जात आहे. सदर अभियानाच्या जनजागृतीसाठी पंचप्रण शपथ सेल्फी तसेच तिरंग्यासोबत सेल्फी स्पर्धा राबविली जाणार असुन यात सेल्फी घेऊन मनपाद्वारे दिल्या गेलेल्या गुगल शीटवर पाठविणाऱ्या काही भाग्यवान विजेत्या नागरीकांना रोख बक्षिसे दिली जाणार आहेत.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमाबाबत संपुर्ण देशात व राज्यात मेरी माटी मेरा देश ( मिट्टी को नमन विरों को वंदन ) अभियान दि.९ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान राबविले जाणार आहे. नागरिकांत आपली मातीविषयी जनजागृती प्रेम व साक्षरता निर्माण व्हावी व या मातृभूमीसाठी झटणारे तसेच त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांचा सन्मान व्हावा या यामागील उद्देश आहे.

माझी माती माझा देश अभियानात नागरिकांना हातात मातीचे दिवे अथवा माती घेऊन पंचप्रण शपथ घेऊन सेल्फी काढायची आहे व हर घर तिरंगा अभियानात राष्ट्रध्वजाचा पुर्ण सन्मान राखुन स्वतः च्या घरी लावलेल्या तिरंग्यासोबतचे क्षण सेल्फीद्वारे टिपुन चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे दिलेल्या https://forms.gle/cszPxPNn-kM6CDVJa6 या गुगललिंक वर पाठवायचे आहेत अथवा सोबत दिलेला QR कोड स्कॅन करावयाचा आहे.तसेच सेल्फी आपल्या सोशल मिडियावर सुद्धा अपलोड करावयाची आहे.

अपलोड करतांना हर घर तिरंगा चंद्रपूर हे सर्व हॅशटॅग वापरणे आवश्यक आहे. सेल्फीमध्ये घर व तिरंगा तसेच मातीचे दिवे अथवा माती हातात घेतली असल्याचे स्पष्ट दिसणे गरजेचे आहे. सेल्फी विथ तिरंगा स्पर्धेसाठी सेल्फी पाठविण्याची अंतिम तारीख १७ ऑगस्ट असुन पंचप्रण शपथ सेल्फी स्पर्धेची अंतिम तारीख २० ऑगस्ट २०२३ आहे. स्पर्धेनंतर ईश्वरचिट्ठीद्वारे निकाल घोषित करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी चंद्रपूर महानगरपालिकेच्या CMC-chandrapur या फेसबुक पेजला भेट द्यावी तसेच स्पर्धेत मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थी, तरुण व सर्व वयोगटातील नागरिकांनी यात सहभाग घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# पुलाची दुरूस्ती करा : शरद जोशी संघटना

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील जानेफळ ग्रुप ग्रामपंचायत ममुराबाद





येथील पूलाचे काम खूप वर्षापासून झालेले नाही पूर्ण पूर्ण ढसाळलेला आहे त्यामुळे ममुराबाद हे गाव तहसील खुलताबाद ग्रामपंचायत फुलंब्री असल्याने गावची दयनीय अवस्था झाली आहे. जास्त पाऊस पडल्यास नागरिकांना दवाखान्यात जाण्यासाठी रस्ताच नाही या गावकऱ्यांना कोण न्याय देईल या पुलावरून अनेक पुढारी नेते मंडळी येतात फक्त निवडणुकीपुरते गोड गोड बोलून गावकऱ्यांना आश्वासन देतात निवडून आल्यानंतर पाच वर्ष हे गाव आहे म्हणून विसरून जातात त्यांचे काम फक्त पाच वर्षासाठीच असतात नंतर पाच वर्षे त्यांना या गावाची काही संबंध नसतो ह्या गावच्या नागरिकांनी कोणाकडे न्याय मागायचा शासनाने ममुराबाद गावाकडे लक्ष देण्याची मागणी शरद जोशी विचार मंच संघटना महाराष्ट्र राज्य जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव कोषाध्यक्ष देवराव आहेर यांनी केली आहे.

या गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे पडल्याचे दिसून आले आहे तर यामुळे रस्त्यावरुन जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या पावसाळा सुरू आहे यात पावसाळ्यात पावसाचे पाणी पडल्यावर मुख्य रस्त्यावर पाणी तुंबत आहे, या तुंबलेल्या पाण्याचा अंदाज न कळता खड्ड्यातुन वाहने टाकावे लागते आहे.

या बाबतीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. शासन व प्रशासन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे तरी हा अमृत महोत्सव काय कामाचा ? आजही ग्रामीण भागात रस्याची दयानीय अवस्था आहे. ममुराबाद जानेफळ या दोन्ही गावाचा थोडाच अंतर आहे, या दोन्ही गावाला ग्रुप ग्रामपंचायत जोडलेली आहे. यात दोन्ही गावाचा विकास कामे करताना थोडीशी कसरत करावी लागते आहे. ममुराबाद हा गाव खुलताबाद तालुक्यात मोडतो, यासाठी स्थानिक नागरिकांना शासकीय कामासाठी खुलताबाद व फुलंब्री चा रस्ता



धरावा लागतो आहे. ममुराबाद या गावातुन जाणाऱ्या रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. ममुराबाद ते शिरोडी पर्यंत अद्याप पर्यंत खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले नाहीत.यासाठी दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बाजार सावंगी रोडवरील माणीकनगर फाट्यापासुन तर शिरोडी या 8- 10 किलोमीटरचा रस्ता आहे, या रस्त्यावर हजारो खड्डे पडले आहेत. या मुळ समस्या कडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी डोळ्यावर पट्टी बांधून आंधळे पणाचा सोंग करत आहे. तसेच या कडे जाणुन बुजून दुर्लक्ष करत आहे. तसेच या बाबतीत संबंधित गावातील सरपंच उपसरपंच व इतर पुढारी डोळे मिटून शांत बसत आहे. ग्रामपंचायतीच्या अंतर्गत कामे असल्यास गावातील सरपंच उपसरपंच दखल घेतात. परंतु जबाबदार लोकप्रतिनिधी व अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहे. सदर या प्रकरणी ममुराबाद ते शिरोडी पर्यंत या दयानीय रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.



# दरेगाव येथे अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे दरेगाव येथे अण्णाभाऊ साठे यांच्या १०३वी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच संदिप गायकवाड, अजिनाथ खंडागळे, पो. पा.कृष्णाकांत बनकर, हिरामण जाधव, राजु खंडागळे, ज्ञानेश्वर जाधव, काशाबाई जाधव, करण जाधव, युसुफ शाह, मिरलाल सोनावणे, दादाराव मगरे, संजय जाधव, विलास जाधव, लक्ष्मण सुर्यवंशी, दगडु बनकर, कांताबाई जाधव, पारवताबाई आहेवाड, सोनुबाई शिंदे, रेखा खंडागळे, शांताबाई सोनवणे आदींची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचे पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. तर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून त्यांचे कार्य अंगकारावे असे, आवाहन यावेळी करण्यात आले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# भूमिपुत्रांच्या आक्रमक भूमिकेमुळे जिल्ह्यात होणार युरिया उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज



**वाशिम :** ऐन मौसमात शेतकऱ्यांना वेठीस धरून त्यांची आर्थिक पिळवणूक करणे ही नित्याचीच बोंब होऊन बसली आहे. परंतु शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या भूमिपुत्र सारख्या संघटनांच्या जागरूकतेमुळे या प्रकाराला आता आळा बसत आहे. वाशिम जिल्ह्यात सतत पडणाऱ्या पावसामुळे पिकांची वाढ खुंटली असून कोवळी पिक पिवळी पडली आहेत. त्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून, ऐन वेळेवर शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत आहे. तर काही ठिकाणी मनमानी भावात युरिया खतची विक्री केल्या जात असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेला मिळताच सदर संघटनेने संबंधित प्रशासनाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. भूमिपुत्रच्या या पावित्र्यामुळे जिल्ह्यात दोन-तीन दिवसात युरिया उपलब्ध होणार असल्याचे आश्वासन राष्ट्रीयकृत कंपनी आरसीएफने भूमिपुत्रला लेखी आश्वासन दिले आहे. जिल्ह्यातील शेतकरी युरीया खतासाठी त्रस्त झाले होते. पीकं छोटी आसतानांच सततच्या पावसाने पीकं पिवळी पडत होती. उघडीप मिळाल्यामुळे आतिपावसाने खराब पीके दुरूस्त करण्यासाठी शेतकरी मोठ्याप्रमाणावर युरीया मागीत होते.संबंधितांकडून आचानक युरीयाची कृत्रिम टंचाई निर्माण करण्यात आली.तर काही ठिकाणी जादा दराने विक्री सुरु होती. अनेक ठिकाणी लींकीकचे प्रकारही उघडकीस आले आहेत. हा सर्व प्रकार भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील युरीयाचे पुरवठादार व सरकारची अंगीकृत कंपनी आरसीएफ चे जिल्हा समन्वयक सुदेश वैनदेशकर, याच्यांसी संवाद साधला. व तात्कळ युरीया उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती.पंरतु तरीही आरसीएफ कडुन प्रतीसाद मिळत नसल्यामुळे, भूमिपुत्र चे वाशिम तालुकाध्यक्ष संतोष सुर्वे, युवक जिल्हाध्यक्ष सचिन काकडे, जिल्हाउपाध्यक्ष आत्माराम सुतार व महावीरसिंग पवार यांच्यासह भूमिपुत्रच्या कार्यकर्त्यांनी वाशिम स्थीत आरसीएफच्या कार्यालयात दोन तास ठिय्या दिला. जोपर्यंत जिल्ह्यात युरिया उपलब्ध होत नाही तोपर्यंत आरसीएफ च्या कार्यालयात बसण्याचे भूमिपुत्र च्या पदाधिकाऱ्यांनी ठरविल्यामुळे आखेर आरसीएफचे सुदेश वैनदेशकर, भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर जिल्हा कृषी अधिकारी गीरी साहेब यांच्या मध्यस्तीने दोन दिवसात युरीया उपलब्ध करून देण्याचे लेखी पत्र आरसीएफ कडुन देण्यात आले. त्यानंतर ठिय्या मागे घेण्यात आला. लेखी दिल्या प्रमाणे युरीया उपलब्ध न झाल्यास आरसीएफ कार्यालयाला कुलूप ठोकणार आसल्याचे या वेळी भूमिपुत्र तालुकाध्यक्ष संतोष सुर्वे यांनी सांगीतले.

# गाव सुधारण्यासाठी ग्रामस्थांचा मोठा वाटा : सरपंच सविता निकम

आधुनिक केसरी न्यूज




**पिशोर :** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील ग्रामपंचायत कार्यलय यांच्या संयुक्त विद्यमानाने विकास कामे प्रगतिपथावर सुरु असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे, त्यांतच या परिसरातून औरंगाबाद जाण्या येण्या करीत नादरपुर पिम्परखेड़ा या गांवातुन जावे लागते, मात्र या दोन्ही गावात मध्यभागी अंजना नदी वाहते आणि जोरदार पाउसाचे आगमन होताच नदीला पुर ही येतो, त्या मुळे अनेकांचे संपर्क तुटायचे तसेच मागील 10 ते 12 वर्षा पासून प्रलंबित पूल आखिर कार या वर्षी पूर्ण पने बांधन्यात आला, त्यांच बरोबर पाण्याच्या दबावने नासधुस झालेली शमशान भूमि या वर्षी दुरुस्त करून लोकांना बसन्या करिता सीमेंट खुर्ची ही बनविन्यात आली आहे, सध्या रिमझिम पाउस सुरु असल्याने या ठिकाणी व्रुक्षची लागवड ही करण्यात आली आहे.

तसेच स्मशानभूमी अंजना नदीच्या पुराखाली वेढली जाऊ नये म्हणून जेसीबीच्या साहाय्याने मुरमाची रेतीची अतिरिक्त भर लावून झाडांची लागवड केली तसेच या झाडांचे संगोपन व संवर्धन व्हावे त्यासाठी नळीद्वारे पाण्याची व्यवस्थाही केली . मागील पावसाळ्यात ही स्मशानभूमी पुराखाली वेढली गेल्याने नागरिकांना अंत्यसंस्कार करण्यात अडचणी येत होत्या . पुराच्या पाण्यात जाऊन नातेवाईकांना अंत्यसंस्कार करावे लागत होते . सरपंच दाम्पत्यांच्या या प्रयत्नाने नागरिकांना पावसाळ्यात होणारी अडचण आता दूर होणार आहे . यावेळी नागरिकांनी त्यांच्या या प्रयत्नांचे कौतूक केले .

कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे शुक्रवार रोजी ग्राम पंचायत कार्यालय नादरपूर ता . कन्नड येथे श्री चव्हाण ( विस्तार अधिकारी पं . समिती कन्नड ), दारकुंडे ( विस्तार अधिकारी पं . स . कन्नड ) यांनी ग्राम पंचायत स्तरावरील विविध विकास कामांची पहाणी करून रमाई योजना घरकुल , स्मशानभूमी सुशोभीकरण , वृक्षलागवड , १५ वा वित्त आयोग निधीतील कामे इ.ची पाहणी केली तसेच ग्राम पंचायत कार्यालय ऑनलाइन तपासणी करण्यात आली . याप्रसंगी त्यांचे सोबत श्री किरण कोल्हे , ग्रामसेवक श्री बनकर , ग्राम पंचायत सरपंच सदस्य तंटामुक्त अध्यक्ष कर्मचारी , ग्रामस्थ हजर होते मोठ्या संखेने उपस्थित होते. जिल्हास्तरीय समिती मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विकास मीना यांचे अध्यक्षतेखाली तसेच माननीय उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ) श्री राजेंद्र रेसले यांचे मार्गदर्शनाखाली समिती सदस्य स्वच्छ भारत मिशन कक्ष संभाजीनगर श्री सत्यजित देशमुख , श्रीमती वैशाली जगताप जिल्हा समन्वयक, श्री सतीश औरंगाबादकर पंचायत समिती कन्नड परिविक्षाधिन तथा सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीयुत सुहास वाघचौरे , श्री संतोष दारकोंडे विस्तार अधिकारी पंचायत समिती कन्नड, स्वच्छ भारत मिशन तालुका समन्वयक श्री चव्हाण, श्री किरतकर यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत नादरपुर सन 2022-23 या वर्षासाठी तपासणी करण्यात आली. यावेळी सरपंच, ग्रामसेवक, उपसरपंच, ग्रामपंचायत कार्यकारी मंडळ, शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, तलाठी आप्पा, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक, बाल आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य पर्यवेक्षक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामपंचायत कर्मचारी व सन्माननीय ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आन्नकाडे यांची राज्य कर अधिकारीपदी पदोन्नती

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** कंधार मतदार संघातील दैठणा ता. कंधार येथील भूमीपुत्र व लोहयाचे जावई असलेले ज्ञानोबा आन्नकाडे यांची राज्य कर अधिकारीपदी पदोन्नती झाली आहे.

दैठणा येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील ज्ञानोबा नामदेव आन्नकाडे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले. अभ्यासाच्या जोरावर व अंगी जिद्द,मेहनत, चिकाटी असल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन राज्य कर निरिक्षक म्हणून ते राज्य शासनाच्या सेवेत दाखल झाले व आता ते यवतमाळ येथे कर निरिक्षक म्हणून कार्यरत आहेत . आता नुकतेच राज्य शासनाने महाराष्ट्रातील १०६ कर निरिक्षकांची पदोन्नती राज्य कर अधिकारी म्हणून केली असून यात ज्ञानोबा आन्नकाडे यांचा समावेश आहे.त्यांची नियुक्ती राज्यकर अधिकारी म्हणुन नागपूर येथे केली आहे.

ज्ञानोबा आन्नकाडे हे लोहा येथील देवराव मुकादम वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष कै.अमृतराव अडगावकर गुरुजी यांचे जावई आहेत. राज्य कर अधिकारी पदी ज्ञानोबा आन्नकाडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन,माजी आ.रोहीदास चव्हाण,हरीभाऊ चव्हाण,शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठुभाऊ महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ( निवड समिती ) नांदेडचे जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार, नगर सेवक संभाजी पा.चव्हाण, राम पा.पवार, सुधाकर पा.पवार, भारत पा.पवार संभाजी पवार,काशिनाथ सिरसीकर सर,लहू पंदलवाड सर यांच्यासह मित्र परीवारांने केले.

# तिकिटासाठी अजिंठा लेणीत पर्यटकांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील अजिंठा लेणीत रविवारी सुट्टी असल्याने जगप्रसिद्ध अजिंठा लेणीम ध्ये पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र सोयगाव एसटी महामंडळाचे दुर्लक्ष दिसून आले, बसच्या तिकिटासाठी अजिंठा लेणीमध्ये पर्यटकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. बस जास्त आणि कंडक्टर कमी दिसले, यामुळे अजिंठा लेणीतून अनेक पर्यटक पायी निघाले. रविवारी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवायला हवी असताना सोयगाव आगार मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचे अधिकारी सुखावले तर पर्यटक त्रस्त झाले. याकडे अधिक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष -

देण्याची गरज असून रविवारीच ४३२० पर्यटकांनी अजिंठा लेणीला भेट दिली. या पर्यटकांमुळे एसटी महामंडळाला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत असताना, तरीही एसटी महामंडळ याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. अजिंठा लेणी येथील एस टी महामंडळाबाबत पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली.

# मिशन इंद्रधनुष्य मोहीम प्रभावीपणे राबवा : आमदार प्रतिभाताई धानोरकर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर तसेच तालुका आरोग्य विभाग वरोरा व नगरपरिषद वरोरा यांचे संयुक्त विद्यमाने वरोरा शहरात नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र तसेच संपूर्ण तालुक्यात ०-५ वर्ष वयोगटातील बालकास विशेष लसीकरण साठी मिशन इंद्रधनुष्य मोहिमेचे उदघाटन आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी वरोरा माजी नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, वरोरा उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, पंचायत समिती वरोरा गटविकास अधिकारी संदीप गोडशेलवार, उपजिल्हा रुग्णालय वरोरा वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल खुजे, आमदार प्रतिनिधी सुभाष दांदडे, बाजार समिती माजी सभापती राजू चिकटे, सुभाष सालवटकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत वीरूटकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रतीक बोरकर, आरोग्य सहाय्यक सतीश येडे, डॉ. मुंजनकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार प्रतिभाताई धानोरकर म्हणाल्या कि, मोहिमेच्या जनजागृतीसाठी शाळांमार्फत प्रभातफेरी, पथनाट्य सादर करावे. लसीकरणाचे प्रमाण कमी असलेली ठिकाणे, झोपडपट्टी, बांधकाम प्रकल्प, वीटभट्टी येथेही लसीकरण मोहीम राबविली पाहिजे. त्याकरिता जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी केले.





# चंद्रपूर, चांदाफोर्ट व बल्लारशाह स्थानकांचा विकास हा ऐतिहासिक महोत्सव : अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होत असतांना प्रधानमंत्री मान. नरेंद्र मोदी जी यांच्या कार्यकाळात अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशभरातील 1309 रेल्वे स्थानकांचा पुर्नविकास करण्याचे ऐतिहासिक कार्य होत असून पहिल्या टप्प्यात 508 रेल्वे स्थानकांचा अत्याधुनिक सोयीसुविधांसह विकास होत असून गोंडकालीन वैभव प्राप्त चंद्रपूरातील चंद्रपूर रेल्वे स्टेशन, चांदा फोर्ट व बल्हारशाह या स्थानकांचा विकास 80 कोटी निधीतून होत आहे. त्याबद्दल मा. मोदीजींचे मनःपूर्वक आभार मानतो. हे कार्य चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांकरीता अनमोल भेट असून केंद्र शासनाचा हा महत्वाकांक्षी उपक्रम एकप्रकारे महोत्सव असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी प्रधानमंत्री मोदीजींच्या शुभहस्ते होऊ घातलेल्या व्हीडीओ कॉन्फ्रेन्सिंग द्वारे भूमीपूजन सोहळ्यापूर्वी आयोजित कार्यक्रमास संबोधित करतांना केले.

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत चंद्रपूर रेल्वेस्थानकाचा पूनर्विकास या दिमाखदार भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी चंद्रपूर रेल्वे स्टेशनच्या वतीने दि 06 ऑगस्ट 2023 रोजी आयोजित



विविध कार्यक्रमास उपस्थित नागरीकांना हंसराज अहीर संबोधित होते. याप्रसंगी चंद्रपूर चे आ. किशोर जोरगेवार, एमईएल कार्यकारी संचालक के. रामकृष्ण, चंद्रपूर महापालिकेचे आयुक्त विपीन पालिवाल,चंद्रपूर महाऔष्णीक केंद्राचे मुख्य अभियंता गिरीष कुमारवार, रेल्वेचे सिपीएम विनोद बंगाले, स्टेशन मास्टर एस.आर.देवगडे, विजय राऊत, रमणिकभाई चव्हाण, राखीताई कंचर्लावार, डॉ मंगेश गुलवाडे, रघुवीर अहीर, पूनम तिवारी आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना हंसराज अहीर म्हणाले की, प्रधानमंत्र्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून लोकांच्या मनात असलेल्या मागणीची या योजनेच्या माध्यमातून परिपूर्ती होणार आहे. या पूनर्विकास योजनेअंतर्गत चंद्रपूर स्टेशनकरीता 27.66 कोटी, चांदा फोर्ट करीता 16.00 कोटी व बल्हारशाह करीता 34 कोटी निधी मंजूर झाला असून या योजनेअंतर्गत प्रवाशांच्या सोयीकरीता अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहे. सरकारच्या गतिमान धोरणांस अभिप्रेत असलेले हे काम गुणवत्तापूर्ण व निर्धारीत वेळेतच पूर्ण होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रवाशांकरीता रेल्वेच्या अनेक सोयी-सुविधा देता आल्या मात्र कोरोना काळात दुर्भाग्याने अनेक महत्वाच्या गाड्या बंद पडल्या त्या पूर्ववत करण्याचा कसोशिने प्रयत्न करु,. तिसऱ्या लाईनचे काम पूर्ण होत आहे, पिटलाईन पूर्णत्वास आली असल्याने जिल्ह्यातील प्रवाशांना सोयीच्या ठरणाऱ्या अनेक गाड्या बल्हारशाह येथून सुटणार आहेत. आपल्या ऋणांची परतफेड करणे हे कर्तव्य असून त्याकरीता सदैव कटिबध्द राहील. चंद्रपूर, बल्लारपूर येथील रेल्वे स्थानकांचा पूनर्विकास पहिल्या टप्प्यात होत आहे हा सौभाग्याचा क्षण आहे. यावेळी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांच्या व मान्यवर अतिथिंच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आली.

या प्रसंगी आ. किशोर जोरगेवार यांनी केंद्र सरकारच्या या योजनेचे स्वागत करुन हंसराज अहीर यांच्या विशेष प्रयत्नातून अमृत भारत योजनेत तेही पहिल्या टप्प्यात चंद्रपूर, चांदा फोर्ट व बल्लारपूर रेल्वे स्टेशन अत्याधुनिक सोयींनी स्वयंपूर्ण होणार असल्याचे सांगीतले. या कार्यक्रमास राजू घरोटे, राजेंद्र अडपेवार, संजय कंचर्लावार, विनोद शेरकी, सुभाष कासनगोट्टुवार, संदीप आवारी, रवि आसवानी, विठ्ठल डुकरे, दिनकर सोमलकर, रवि लोणकर, वंदना संतोषवार, गौतम यादव, सुदामा यादव यांचेसह रेल सुविधा संघर्ष समितीचे रमेश बोथरा, नरेंद्र सोनी, डॉ गोपाल मुंधडा, डॉ भूपेश भलमें व शहरातील विविध क्षेत्रातील गनमान्य नागरीक उपस्थित होते.

# दुचाकी बैलगाडीवर आदळून एक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील साडूच्या भेटीसाठी येत असताना हलविरा पाटी जवळी रस्ता ओलांडणाऱ्या बैलगाडीवर दुचाकी आदळून जिंतूर येथील एका ३२ वर्षीय युवकाचा उपचारादरम्यान मृत्यु झाल्याची घटना रविवारी (दि.६) रात्रीच्या सुमारास घडली.



जिंतूर येथील राजु दत्तराव ढगे (वय ३२ वर्ष) हे चारठाणा येथील साडूला भेटण्यासाठी दुचाकी (क्रमांक एमएच २२ एएल ३२७७) यावरून येत असताना जिंतूर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील हलविरा पाटी जवळ अचानक बैलगाडी रोड ओलांडत असताना त्याची दुचाकी बैलगाडीवर धडकली या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. घटनास्थळी रक्तस्राव मोठया प्रमाणावर झाल्याने त्याना जिंतूरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी डॉ. परिहार यांनी तपासून मृत घोषित केले. अपघातानंतर चारठाणा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद साने,पोहेका सातपुते,पो.कॉ पवन राऊत आदींनी घटनास्थळी भेट दिली असुन दुचाकी ताब्यात घेतली आहे. मयताच्या पश्चात आई , पत्नी,दोन मुली, एक भाऊ असा परिवार आहे. सोमवारी (दि.७) दुपारी १२ वाजता अत्यंसंस्कार करण्यात आले. मयत राजू ढगे जिंतूर शहरातील बलसा रोडवर वडापावचा गाडा लावून व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असे. मात्र अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने कुटुंबाचा कर्ता पुरुषच गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



# संघटनेत सर्व पत्रकारांना सामावून घेणार : रोहिणी साळुंखे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** पत्रकारांसाठी हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी शिरवळ प्रिंट अँड डिजिटल मीडिया पत्रकार संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. शिरवळ शहर व ग्रामीण भागातील विविध साप्ताहिक, दैनिक,न्यूज पोर्टल, डिजिटल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया साठी कार्यरत असलेल्या पत्रकार बंधू भगिनींना संघटित करून पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. संघटनेत सर्व पत्रकारांना सामावून घेणार असल्याचे नवनियुक्त अध्यक्षा रोहिणी साळुंखे यांनी म्हटले आहे.शिरवळ ता.खंडाळा येथे शिरवळ प्रिंट अँड डिजिटल मीडीया पत्रकार संघाची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आलेली असून अध्यक्ष पदी रोहिणी साळुंखे व उपाध्यक्ष पदी गणेश जाधव यांची निवड करण्यात आलेली आहे.निवडी बद्दल रोहिणी साळुंखे यांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी इतर पदांवर ही नियुक्ती नेमण्यात आलेल्या आहेत.

दिनांक ६ ऑगस्ट रोजी शिरवळ येथील एस एस के इन्स्टिट्यूट येथे शिरवळ प्रिंट अँड डिजिटल मीडिया पत्रकार संघाची बैठक आयोजित करण्यात आली होती.दैनिक पुढारीचे शिरवळ प्रतिनिधी रोहिणी साळुंखे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्ष पदी ए बी न्युज मराठी या न्यूजचे सातारा जिल्हा प्रतिनिधी गणेश जाधव सचिवपदी दैनिक तरुण भारतचे शिरवळ प्रतिनिधी भागवत चव्हाण, खजिनदारपदी दैनिक नवराष्ट्र शिरवळ शहर प्रतिनिधी तसेच संपादक राजगड रिपोर्टिंगचे जीवन सोनवणे, प्रसिध्दी प्रमुखपदी दैनिक अक्षराजचे धर्मेंद्र वर्पे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.दैनिक महाराष्ट्र न्यूजचे पोपटराव भिसे यांची सल्लागार पदी तर सेव्हन स्टार न्यूजचे सूरज साळुंखे यांची कार्यकारीणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. नियुक्ती बद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले.

# पत्रकारास शिवीगाळ केल्याप्रकरणी आ. किशोर पाटलांवर कारवाई करण्याची मागणी

## जिल्हा पत्रकार संघाचे महसूल प्रशासनासह पोलीस अधीक्षकांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पत्रकार संदीप महाजन यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी पाचोरा तालुक्याचे आ. किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांना निवेदन देवून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हा लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा वारसदार मानला जातो. लोकशाही व्यवस्था सुदृढ ठेवण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची ठरत असते. पत्रकार समाजाचा आरसा असतो. जागरुक पहारेकरी असतो. चुकीच्या व समाजव्यवस्थेला घातक ठरणार्या बाबी प्रसारमाध्यमे उघडकीस आणतात. एक प्रकारे पत्रकार हा समाजव्यवस्थेत जागल्याचे काम करीत असतो. म्हणून प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तभ म्हटले जाते. या चौथ्या स्तंभाचा वारसदार असलेले पत्रकार संदीप महाजन यांना पाचोरा तालुक्याचे आमदार किशोर पाटील यांनी



अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. लोकप्रतिनिधीने पत्रकाराशी असे वागणे हे लोकशाहीचा व माध्यमांचा अपमान करणारे आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार सघातर्फे याप्रकरणी आ. किशोर पाटील यांचा तीव्र निषेध करीत आ. किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रविंद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलींद बैसाणे, विद्यमान अध्यक्ष विशाल ठाकूर, उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष अतुल पाटील, प्रांतिक प्रतिनिधी तुषार बाफना, कार्यकारिणी सदस्य प्रा. मोहन मोरे, प्रकाश शिरसाठ, पवन मराठे, डॉ. श्रीकृष्ण बेडसे, जॉनी पवार, देवेंद्र पाटील, आकाश सोनवणे, सिध्दार्थ मोरे, अजिंक्य देवरे, पुरुषोत्तम गरुड, जमील शाह, सुनील चौधरी, दिपक शिंदे, सुनील बैसाणे, किशोर पाटील, नागिंद मोरे, मनोहर सोलंकी, गणेश पवार, सुनील निकम इत्यादी पत्रकारांच्या सह्या आहेत.



# कामगार कल्याण योजना नोंदणी संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील ग्रामीण भागात केंद्रीय अर्थमंत्री डॉ भागवत कराड यांच्या नेतृत्वाखाली व भारतीय जनता पार्टी जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ खंबायते व भारतीय जनता पार्टी जिल्हा सचिव व कन्नड विधान सभा निवडणूक प्रमुख श्री संजय गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा.काकासाहेब आडे यांच्या प्रयत्नाने कामगार कल्याण योजना नोंदणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

या प्रसंगी सोशल वर्कर श्री मनोज शेजव, सोशल वर्कर कुमारी आचल शेजव, ता.उपाध्यक्ष पपू सेठ दवंगे, भारतीय जनता पक्षाचे बुथ अध्यक्ष गणेश राठोड, व सर्व भारंबा वाडी, भारंबा तांडा ग्रामस्थ मंडळी हजर होते. सदरील फार्म नि शुल्क भरून घेतले व प्रा.काकासाहेब आडे यांनी कामगार कल्याण योजना विषय माहिती सांगितली. कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



# साहाय्यक पोलीस निरीक्षकाची पत्रकाराला शिवीगाळ

## निफाड पोलीस ठाण्याच्या आवारातील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** पोलीस ठाण्यात कामानिमित्त गेलेल्या एका पत्रकाराची शहानिशा न करता नुकताच पदभार स्वीकारलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाने शिवीगाळ केल्याचा प्रकार घडल्याने निफाड पोलिसांच्या मनमानीपणावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र डॉ.बी.जी.शेखर पाटील यांना अवगत करण्यात आले असून निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे यांना निवेदन देण्यात आले आहे.
येथील पत्रकार देविदास बैरागी हे शुक्रवारी रात्री कामानिमित्त पोलीस स्टेशमध्ये गेले असता एका प्रकरणात पोलीस ठाण्यात आलेला व्यक्ती बैरागी यांच्याशी बोलत होता. यावेळी उपस्थितांना नुकतेच नांदगावहून बदली होऊन आलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील यांनी तुमचे इथे काय काम आहे ? असा तावातावाने प्रश्न विचारला. यावर बैरागी यांनी पत्रकार असून कामानिमित्त आलो आहे असे सांगितले. मात्र ओळख सांगूनही पाटील यांनी अपशब्द वापरून उपस्थित नागरिकांसमोर शिवीगाळ करत अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. या प्रकरणामुळे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांना निफाड पोलिसांकडून अशी वागणूक दिली जात असेल तर सामान्य नागरीकांचे काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या संतापजनक प्रकारामुळे शासकीय कार्यालयात पत्रकारांना मिळणाऱ्या वागणुकीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.
याबाबत पोलीस निरीक्षक बापू महाजन यांना सांगितले असता त्यांनी, 'ईश्वर पाटील नवीन आहे' असे सांगत हात वर करत त्यांची बाजू घेतली. त्यामुळे निफाड पोलिसांच्या कामकाजावर वरिष्ठांचे लक्ष नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. घटनेबाबत स्थानिक पत्रकारांना कळताच त्यांनी जमा होत निफाड पोलीस उपविभागीय अधिकारी निलेश पालवे यांना



निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी केली. याबाबत सखोल चौकशी केली जाईल अशी ग्वाही पालवे यांनी दिली. यावेळी निफाड प्रेस क्लबचे अध्यक्ष सुनील कुमावत, आनंदा जाधव, दीपक श्रीवास्तव, किशोर सोमवंशी, रावसाहेब उगले, देविदास बैरागी उपस्थित होते. ईश्वर पाटील नवीन आले असले तरी येथे कार्यरत असलेले पो.निरीक्षक बापू महाजन यांच्याकडून जवळपास सर्वच पत्रकारांना अपमानास्पद वागणूक मिळत असते. निफाडचा वरिष्ठ पोलीस अधिकारीच पत्रकारांना अशी वागणूक

> निफाड पोलीस ठाण्यातील स.पो.नि.ईश्वर पाटील यांनी पत्रकाराला केलेल्या शिवीगाळ प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल.
> – डॉ.बी.जी.शेखरपाटील, उपमहानिरीक्षक

देत असेल तर कानिष्ठांकडून कशी अपेक्षा ठेवावी ? त्यामुळे त्यांना माध्यमे व घटना याचे प्रशिक्षण द्यावे लागेल का असा प्रश्न पत्रकारांनी केला आहे. निफाड हे तालुक्याचे गाव असून येथे मोठा फौजफाटा असला तरी या परिसरातील गुन्हेगारीकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. निफाड तीनफुलीवरून अवैध वाहने बिनदिक्कत जातात. मागील महिन्यात नाशिकच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून युरियाचा काळा बाजार करणारी ट्रक निफाड शहरात पकडली गेली मात्र, निफाड पोलीस याबाबत अनभिज्ञ होते. निफाड तीनफुली वर शिर्डीला जाणाऱ्या गुजरातच्या वाहनांकडून वसुलीसाठी मात्र कर्मचारी सक्रिय असताना दिसतात.



# शेतकऱ्यांच्या पोरांची महाराष्ट्रात फौज उभी करून रान पेटवणार : रविकांत तुपकर

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**
**लोणी खुर्द :** संपूर्ण महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांच्या पोरांची फौज उभी करणार असल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केले आहे. काल त्यांनी अचानकपणे वैजापूर तालुक्यात दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी त्यांचे जुने सहकारी असलेले अणि आता आमदार रमेश बोरणारे यांच्या सोबत शिवसेना युवा सेना उपजिल्हाप्रमुख पदावर कार्यरत संतोष सुर्यवंशी यांचा पांडुरंग इंग्लिश स्कूल शाळेत भेट दिली. विद्यार्थ्यांना सोबत संवाद साधला या दौऱ्यात भारत राष्ट्र समितीचे चंद्र शेखर साळुंके हे सुधा जून सहकारी सोबत होते. गेल्या काही दिवसांपासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या कार्यपद्धतीवर रविकांत तुपकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. याच दरम्यान त्यांनी जुने सहकारी यांची भेट घेवून तालुक्यात दौरा करून शेतकर्‍यांच्या भेटी गाठी घेतल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात शेतकर्‍यांना वाली कुणी राहिले नाही शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे सत्ताधारी असो किंवा विरोधक कुणीही आज शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा प्रयत्न करत नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आता मी महाराष्ट्रभर प्रत्येक भागात दौरा करून राज्य पिंजून काढत हजारो तरुणांची फौज उभी करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर रान पेटणार असल्याचे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले. ठीक ठिकाणी त्यांचे जल्लोषात शेतकरी आनि कार्यकर्त्यांनी स्वागत केले. लोणी खुर्द येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी शेतकरी चवळवळ टिकली पाहिजेत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोणीच बोलायला तयार नाहीत सत्ताधारी विरोधक ऐकमेकावर टिका करण्यात व्यस्त आहे म्हणून शेतकरी चळवळीला बळ मिळाले पाहिजेत म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने देखील तुपकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष दादाभाऊ तांबे, काकासाहेब गोरे, संतोष सुर्यवंशी चंद्रशेखर साळुंके शांताराम मगर सर्जेराव जाधव. आनिल पवार, सोमनाथ तांबे तैमुर सैय्यद गजानन निकम, प्रमोद मगर, तात्याराव मगर, आदींची उपस्थिती होती.

# विशेष मिशन इंद्रधनुष 5.0 मोहिमेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जि.प.आरोग्य विभाग, सामान्य रुग्णालय व चंद्रपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्यमान भारत शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र 2 रामनगर येथे 'विशेष मिशन इंद्रधनुष 5.0' लसीकरण मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घघाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.
यावेळी गौरी दुमाले या बालिकेस लसीकरणाचा डोज देण्यात आला. बालकामधील मृत्यू व आजारपणाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण हे एक प्रभावी साधन आहे. यासाठी ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर 2023 पर्यंत 3 टप्प्यांमध्ये सर्व जिल्हे व महानगरपालिकांमध्ये 'विशेष मिशन इंद्रधनुष 5.0' कार्यक्रम राबविण्यात येतआहे. या मोहिमेत लसीकरणापासून पूर्णपणे वंचित राहिलेले किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या सर्व बालक व गरोदर



माता यांचा शोध घेऊन त्यांना लसीकरण करण्यात येणार आहे.
सदर मोहिमेदरम्यान जिल्हयातील सर्व ग्रामीण, शहरी व मनपा क्षेत्रातील आशा कार्यकर्ती व ज्या भागात आशा नाही तेथे अंगणवाडी सेविका घरोघरी सर्वेक्षण करून गरोदर माता व 0 ते 5 वर्षांच्या बालकांची यादी तयार करतील. लसीकरणापासून वंचित राहिलेल्या गरोदर मातेचे व बालकांचे नियमित लसीकरण सत्रासोबतच विशेष लसीकरण सत्राचे आयोजन करून सदर मोहिमेदरम्यान लसीकरण करण्यात येणार आहे.
या मोहिमेच्या प्रथम टप्प्यात चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण, शहरी व मनपा क्षेत्रातील एकूण 4967 बालकांना व 1156 गरोदर मातांना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. तरी लसीकरण कार्यक्रमाचा लाभ चंद्रपूर जिल्हयातील जनतेने घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे केले आहे. यावेळी कार्यक्रमाला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजकुमार गहलोत, डॉ. प्राची नेहुलकर, मनापाच्या मुख्य वैद्यकीय अधिकरी डॉ.विनीता गर्गेलवार, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश साठे, डॉ. हेमंत कन्नाके, डॉ. अश्विनी भारत आदी उपस्थित होते.




# विळेगाव (ध) येथील स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** तालुक्यातील विळेगाव (ध) येथील स्वस्त धान्य दुकानदार राशनधारकांना वेळेवर धान्य देत नाही, लोकांचे थम्ब घेऊन परस्पर धान्याची विल्हेवाट लावतो त्यामुळे येथील स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर पुरी यांनी तहसीलदारांकडे केलेली आहे.
धर्माबाद तालुक्यातील पुरवठा विभागातील अधिकारी व गोदामपाल यांचे प्रकरण अजून थंड झालेले नसतानाच गावखेड्यातील स्वस्त धान्य दुकानदाराच्या तक्रारी येत आहेत.
शासन गोर गरीब लोकांनी उपाशी राहू नये, त्याच्या हाताला काम नसले तरी त्याचे लेकरंबाळांची उपासमार होऊ नये यासाठी स्वस्त धान्य दुकानदारांच्या माध्यमातून रेशन धारकांना गहू, तांदूळ, साखर देत असते. मात्र विळेगाव (ध) येथील स्वस्त धान्य दुकानदार राशनधारकांना



वेळेवर धान्य देत नाही, लोकांचे थम्ब घेऊन परस्पर धान्याची विल्हेवाट लावतो त्यामुळे गोरगरीब रेशनधारकांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळत नाही. त्यामुळे येथील स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर पुरी यांनी तहसीलदारांकडे निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.
आमदार राजेश पवार यांनी या संदर्भात अगोदरच आवाज उठवीला होता. या प्रकरणातही ते लक्ष घालणार का ? पुरवठा विभाग नेमकी काय कारवाई करणार याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# पैठण बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद, बहुजन क्रांती मोर्चात एकीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राष्ट्रीय अदिवासी एकता परिषदेने पुकारलेल्या भारत बंदला पैठण शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत बुहूजन क्रांती मोर्चाच्या माध्यमातून भव्य असा मोर्चा काढून केंद्र सरकार व मणीपुर सरकारचा निषेध नोंदविला. पैठण शहर बंद करून शहरातील नेहरू चौक येथून मोर्चाला प्रारंभ करून तहसिल कार्यालयावर मोर्चाचा समारोप करण्यात आला.

मणिपुर येथील अदिवासी महिलांची नग्न धिंड काढून अमानवी कृत्य त्याठिकाणी केल्याने व बहुजन समाजातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग तसेच धर्मपरिवर्तीत अल्पसंख्याक समुदयाच्या संविधानिक हक्क अधिकारावर गदा आणणाऱ्या समान नागरी कायद्याच्या विरोधात व महापुरूषांच्या केलेल्या अवमान प्रकरणी राष्ट्रीय अदिवासी एकता परिषदेच्या माध्यमातून भारत बंदचे अवाहन करण्यात आले होते. त्यात भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी देशपातळीवर भारत बंदला समर्थन दिले असल्याने देशाच्या प्रत्येक राज्यात बहूजन क्रांती मोर्चा या नावावर आपपल्या राज्यातील फुले शाहू आंबेडकर तथा ओबिसी संघटनांनी पाठिंबा दिला होता.

त्याचाच एक भाग म्हणून पैठण दि. ७ वार सोमवार रोजी बहुजन क्रांती मोर्चा संयोजन समितीले पैठण बंदची हाक देवून महामोर्चा काढला व केंद्र सरकार व मणिपूर सरकारचा निषेध नोंदवत महिला पुरूषांनी शहरातील नेहरू चौकातून हिरवे, पिवळे, निळे, भगवे ध्वज व सरकारच्या विरोधातील फलक हातात घेवून सर्व बहुजन महापुरूषांना अभिवादन करत तहसिल कार्यालयावर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन करून तहसिलदार सारंग चव्हाण यांना निवेदन देवून मोर्चाचा समारोप करण्यात आला. यामध्ये




भारत मुक्ती मोर्चा, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया ए, बहुजन मुक्ती पार्टी, बंचित बहुजन अघाडी, एकलव्य संघटना (शिवाजीराव ढवळे) शेतकरी कामगार पक्ष, समता परिषद व मुस्लिम बांधवांच्या संघटनांनी पाठिंबा दर्शविला होता. यावेळी सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते महिला व पुरूषांचा मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर स्थानिक पोलिस प्रशासनाच्या वतिने मोठा पोलिस पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



# मोटरपंप चोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गजेंद्र सुकलाल शिंदे वय 59 वर्ष व्यवसाय शेती रा. कावठी ता. जि. धुळे यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयात फिर्यादी व इतर तीन शेतक-याच्या विहिरीतील जलपरी मोटार पंप चोरी झाल्या आहेत. सदर गुन्हयाचा तपास असई / रविंद्र राठोड यांचे कडे दिलेला आहे.

सदर गुन्हयात सोनगीर पो स्टे प्रभारी अधिकारी सपोनि श्री गणेश फड यांना बातमीदाराकडुन, गोदुर, नेर येथील काही चोरटयांची बातमी मिळाल्याने सपोनि फड यांनी राहुल सानप, सुरज सावळे अशा पथकास तात्काळ सदर गुन्हयाचे तपासकामी रवाना केले असता त्यांनी नेर, ता. जि. धुळे येथून दोन संशयीत यांना ताब्यात घेतले त्यावरून केलेल्या चौकशीत गोदुर ता. जि. धुळे येथील 03 जणाचे नाव समजल्याने त्यांना देखील ताब्यात घेवुन कसून तपास केला असता केला असता सदर आरोपीनी गुन्हयाची कबुली दिली त्यांच्याकडुन लागलीच एक मोटर पंप (जलपरी) हस्तगत केली असुन चोरी करण्यासाठी वापरलेल्या दोन मोटर सायकल जप्त करण्यात आल्या तसेच सदर आरोपीनी चोरी केलेल्या इतर मोटर पंच (जलपरी) या धुळे येथील इमरान शेख रौफ रा. मोगलाई धुळे या भगार व्यवसायीकास विक्री केल्याचे सांगीतले. सदर भंगार व्यवसायीकाचे येथुन सोनगीर पोलीस स्टेशन येथे दाखल १) गु.र.नं. 42/2023 भादवि कलम 379 अन्वये व २) गुरनं. 210/2023 भादवी कलम 379 अन्वये या गुन्हयांतील एकुण चार जुन्या वापराच्या मोटार पंप जप्त करण्यात आल्या आहेत. अशा एकुण 05 मोटार पंच सुमारे 32,000/- रुपये किंमतीच्या आरोपीताकडुन जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपी पैकी 1 ) वासुदेव प्रकाश भिल वय - 30 रा. भिलाटी नगाव रोड गोदुर ता. जि. धुळे 2 ) रामु गुलाब पवार वय 19 वर्ष रा. रा. भिलाटी नगाव रोड गोदुर ता. जि. धुळे यांनी त्याचा साथीदार आकाश विकास पवार, रा. गोदुर ता. जि. धुळे याच्या मदतीने यापुर्वी कावठी मेहेरगांव , सैताळ, चिंचवार, गोदुर, मोराणे, इत्यादी शिवारातुन अनेक मोटर पंप चोरी केल्याचे सांगितले आहे. त्याअनुषगाने सदर दोन आरोपीना अटक करून मा.न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी मंजुर असुन अधिक तपास करीत आहेत तसेच यातील ताब्यात घेतलेले संशयीत पैकी इतर 03 विधी संघर्ष ग्रस्त बालकांना त्याच्या पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक धुळे श्री. संजय बारकुंड सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री किशोर काळे सो, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी धुळे ग्रामीण विभाग, साक्री श्री साजन सोनवणे सो, याचे मार्गदर्शनाखाली सोनगीर पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक श्री गणेश फड, असई रविद्र राठोड, किरण राजपुत, पोना 1348 राहुल सानप, पोना 1142 अमरिश सानप, पोकों 1563 सुरज सावळे, पोकॉ/491 उन्मेश आळंदे यानी केली आहे.

# अण्णा भाऊ साठेंना उपक्रमातून अभिवादन

## जि.प. प्राथमिक शाळेत वाटप केले २०० टिफिन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जग बदल घालुनी घाव, सांगुनि गेले मज भीमराव"असे म्हणणारे व संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लोकमानसात गतिमान करण्यासाठी शाहिरीच्या माध्यमातून संघर्ष करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नीरा ता.पुरंदर येथे एक अनोखा उपक्रम घेण्यात आला.निरेतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना टिपिन वाटप करण्यात आले.शाळा नंबर १ आणि २ च्या विद्यार्थ्याकरीता एकुण २०० टिफिन देण्यात आले.तसेच खाऊ वाटप ही करण्यात आले.

यावेळी सरपंच तेजश्री काकडे,उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सदस्य संदीप धायगुडे, सदस्य सुनील चव्हाण, सदस्य अभिषेक भालेराव, शाळा नंबर १ चे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश तासुसकर, शाळा नंबर २चे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल साबळे, शाळा नंबर १ चे मुख्याध्यापक संगीता बालगुडे, शाळा नंबर २ चे मुख्याध्यापक सुनील पवार, ॲड.पृथ्वीराज चव्हाण, तात्या जावळे, राजू गोरे, दीपक जाधव, बापुराव पाटोळे, दयानंद चव्हाण, स्वप्नील कांबळे, अक्षय चव्हाण,दीपक काळे, निलेश गोरे, अमर गोरे,सुरेश वाघमारे, रमेश वाघमारे, विजू पाटोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना टिपिन वाटप करण्यात आल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे, सदस्य अनिल चव्हाण, संदीप धायगुडे, अभिषेक भालेराव, अमोल साबळे, राजू गोरे,पाटोळे सर, ॲड.पृथ्वीराज चव्हाण यांनी मनोगते व्यक्त केली. शाळा नंबर २ मध्ये मुख्याध्यापिका म्हणून कारभार सांभाळलेल्या मंगल बबन आगवणे यांची पंचायत समिती बारामती येथे विस्तार अधिकारी नियुक्ती झाल्याबद्दल निरा ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्य आणि शालेय प्रशासन यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच प्रभारी मुख्याध्यापक म्हणून सुनील पवार यांच्या कडे कारभार देण्यात आल्याने त्यांचा ही सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना टिफिन, खाऊ वाटप आदी कार्यक्रम घेण्यात आल्याने जयंती दिनी असे उपक्रम हाती घेतल्याने एक सामाजिक कार्य पार पडत असल्याचे समाधान आयोजकांना वाटत आहे.दीपक काळे, राजू गोरे, दीपक जाधव, निलेश गोरे, अमर गोरे, सुरेश वाघमारे, रमेश वाघमारे, विजू पाटोळे यांच्या संयुक्त सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला.यावेळी उपक्रमाचे सूत्रसंचालन प्रभारी मुख्याध्यापक सुनील पवार यांनी केले तर आभार राजू गोरे यांनी मानले.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर